आज आषाढी एकादशी सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा



नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५१ * अंक ६ * * अमरावती * रविवार, दिनांक ०६ जुलै २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात..

### लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष

■ **पटना :** लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. शनिवारी पाटणा येथील बाबू सभागृहात झालेल्या राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. ते २०२८ पर्यंत राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष राहतील.

अधिवेशनाचे अध्यक्षपद पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. रामचंद्र पूर्वे यांनी भूषवले. लालू यादव यांनी २३ जून रोजी पाटणा येथील पक्ष कार्यालयात अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्याविरुद्ध इतर कोणत्याही नेत्याने अर्ज दाखल केला नाही. यानंतर निवडणूक अधिकारी डॉ. पुर्वे यांनी त्यांना बिनविरोध अध्यक्ष घोषित केले.

### पुजाऱ्याने मंदिरात केला दोन मुलींवर बलात्कार

■ **छतरपूर :** मध्यप्रदेशातील छतरपूरमध्ये एका ६० वर्षीय पुजाऱ्यावर मंदिरात दोन मुलींवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. मुलींचे कुटुंब मंदिरात पोहोचताच पुजाऱ्याने त्यांच्यावर त्रिशूळाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. लोकांनी त्याला मारहाण केली. पोलिसांनी आरोपी पुजाऱ्याला पॉक्सो अंतर्गत ताब्यात घेतले. ही घटना गढीमलहरा येथील आहे. आरोपी भागवत शरण दुबे हा गावातील महाकाल आश्रम मंदिराचा पुजारी आहे. तो उजरा येथील रहिवासी आहे आणि गेल्या ४ वर्षांपासून आश्रमात राहत आहे. ५ आणि ६ वर्षांच्या चुलत बहिणी घरी जात होत्या. पुजारी दोघांनाही प्रसाद देण्याच्या बहाण्याने मंदिरात घेऊन गेला आणि त्यांच्यावर बलात्कार केला.

### आरोपी नीरव मोदीच्या भावाला अमेरिकेत अटक

**वॉशिंग्टन :** पीएनबी घोटाळ्यातील आरोपी नीरव मोदीचा भाऊ निहाल मोदी याला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे. भारताच्या अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) निहालच्या प्रत्यार्पणासाठी अपील केले होते.

## १८ वर्षानंतर ठाकरे बंधूंचे मनोमिलन

# उद्धव, राज एकत्र!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:**

शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे हे दोन चुलत बंधू तब्बल १८ वर्षानंतर एकत्र आले आहेत. राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषा शिकवण्याचा घेतलेला निर्णय अखेर मागे घेतला असून, यानंतर ठाकरे बंधूंनी आयोजित केलेल्या विजयी मेळाव्याला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजच्या विजयी मेळाव्यातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच्यावर सडकून टीका केली. आमच्यात (राज व उद्धव) असणारा आंतरपाट आज अनाजीपंतांनी दूर केला. आम्ही एकत्र आलोत. एकत्र राहण्यासाठी. हे पाहून अनेक बुवा-महाराज आज बिझी आहेत. हिंदीची सक्ती तुमच्या ७ पिढ्या आल्या तरी आम्ही होऊ देणार नाही, असा इशाराही सत्ताधारी भाजपला दिला.

उद्धव ठाकरे म्हणाले, आज बऱ्याच वर्षांनंतर राज व माझी भेट व्यासपीठावर झाली. आता पंचाईत अशी आहे की, ते मला सन्माननीय उद्धव ठाकरे असे म्हणाले. आणि साहजिकच आहे की, त्यांचेही कर्तृत्व आपण सर्वांनी पाहिले आहे. म्हणून मी भाषणाची सुरूवात करताना सन्माननीय राज ठाकरे आणि जमलेल्या माझ्या तमाम मराठी, हिंदू बांधवांनो, भगिनीनो व मातांनो. राज यांनी अप्रतिम मांडणी केली आहे. त्यामुळे माझ्या भाषणाची गरज आहे असे मला वाटत नाही.



ते पुढे म्हणाले, भाषेवरून एखादा विषय निघतो, तेव्हा तो केवळ वरवरचा धरून चालणार नाही. मधल्या काळात अगदी दोघांनी म्हणजे मी व राज काय आपण सर्वांनी या नतद्दष्टांचा अनुभव घेतला आहे. वापराये आणि फेकून द्यायचे. आता आम्ही दोघे मिळून तुम्हाला फेकून देणार आहोत. आजपर्यंत वापर करून घेतलात, अरे डोक्यावर शिवसेनाप्रमुख नसते तर तुम्हाला महाराष्ट्रात कोण ओळखत होते. कोणत्या भाषेत बोलत होतात. राज यांनी सर्वांच्या शाळा काढल्या, पण मोदींची शाळा कोणती? सर्वात उच्चशिक्षित आहेत....

उद्धव म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी भाषेच्या आधारावर गुंडगिरी सहन करणार नाही असा इशारा दिला आहे. महाराष्ट्रात मराठी माणूस न्याय मागण्यासाठी आंदोलन करत असेल आणि त्याला तुम्ही गुंड म्हणत असाल तर आम्ही गुंडच आहोत. आहोत आम्ही गुंड. न्याय मागणे म्हणजे गुंडगिरी नाही.

### भाजप ही अफवांची फॅक्टरी

पण हे जे काही मध्यंतरी बोललो तसे भाजप ही अफवांची फॅक्टरी आहे. मधल्या काळात त्यांनी सुरू केले होते की, उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडले. हिंदुत्व ही काही कोणत्याही भाषेची मक्तेदारी नाही. आम्ही अस्सल मराठी बोलणारे तुमच्याहून जास्त कट्टर देशाभिमानी हिंदू आहोत.

### मला बाळासाहेबांचे आशीर्वादच मिळत असतील

# फडणवीस यांचा ठाकरेंवर पलटवार



■ **वृत्तसंस्था, पंढरपूर, दि. ५ :**

राज व उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वादच मलाच मिळतील, अशा उपरोधिक सूरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनावर भाष्य केले आहे. मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे. पण त्या ठिकाणी केवळ रुदालीचे भाषण झाले, असे ते म्हणाले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या पंढरपूरच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील नियोजनाचा आढावा घेत प्रशासनाने केलेल्या तयारीचे तोंड भरून कौतुक केले. आपल्या प्रशासनाने येथे अतिशय उत्तम व्यवस्था केली आहे. आता उद्याचा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. निश्चितपणे यावेळी जशी उत्तम व्यवस्था झाली. आषाढीचे पर्व संपल्यानंतर काही उणिवा राहिल्या काय? हे पुन्हा पाहिले जाईल. पुढच्या वर्षी याहून चांगली व्यवस्था करू, असे ते म्हणाले.

यावेळी पत्रकारांनी त्यांचे राज व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाकडे लक्ष वेधले. त्यावर फडणवीस उपरोधिकपणे म्हणाले, मी राज ठाकरे यांचे आभार मानतो. त्यांनी दोन बंधू एकत्र आणण्याचे श्रेय मला दिले. श्रद्धेय बाळासाहेबांचे आशीर्वाद हे मलाच मिळत असतील. पण मला असे सांगण्यात आले होते की, तिकडे विजयी मेळावा होणार आहे.

## चंदरकोटमध्ये ताफ्यातील बसेसची टक्कर

## ३६ जण जखमी

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ५ :**

अमरनाथ यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या ताफ्यातील चार बसेसची टक्कर झाली. रामबन जिल्ह्यातील चंदरकोट लंगरजवळ झालेल्या या अपघातात सुमारे ३६ प्रवासी जखमी झाले. ब्रेक फेल झाल्यामुळे बसच्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. त्यामुळे ताफ्यातील आणखी तीन बसेस एकमेकांवर आदळल्या.

ही बातमी मिळताच, बचाव पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली आणि जखमी यात्रेकरूंना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात रामबन येथे नेण्यात आले. उर्वरित प्रवाशांना इतर वाहनांमधून पहलगामला पाठवण्यात आले. तत्पूर्वी, मुसळधार पावसाला न जुमानता, शनिवारी भगवती नगर बेस कॅम्पमधून ६,९०० यात्रेकरूंचा एक नवीन जथ्था रवाना झाला. या जथ्थ्यात ५१९६ पुरुष, १४२७ महिला, २४ मुले, ३३१ साधू आणि साध्वी आणि एक ट्रान्सजेंडर यांचा समावेश आहे. यात्रा सुरू झाल्याच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत २६,००० हून अधिक भाविकांनी पवित्र गुहेतील बर्फाच्या शिवलिंगाचे दर्शन घेतले होते.

## हिट अँन्ड रनमध्ये जखमी महिलेचा मृत्यू


■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**

भरधाव असलेल्या पिकअप वाहनाच्या चालकाने रस्त्यावर उभ्या महिलेला जबर धडक दिली आणि पळून गेला. या गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना कोराडी ठाण्यांतर्गत सुरादेवी मार्गावर घडली.

## तेलंगणा कारखाना स्फोटातील मृतांची संख्या ४० वर

■ **वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. ५ :**

तेलंगणा फार्मा कारखान्यातील स्फोटातील मृतांची संख्या शनिवारी ३९ वरून ४० वर पोहोचली. जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी चंद्रशेखर बडुगु यांनी सांगितले की, आज सकाळी आणखी एका जखमी कामगाराचा मृत्यू झाला. आता १९ जखमींवर उपचार सुरू आहेत, तर नऊ जणांचा शोध सुरू आहे. ३० जून रोजी सकाळी ८.१५ ते ९.३० च्या दरम्यान पसुमिल्लाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची इंडस्ट्रीजमध्ये हा अपघात झाला. बचाव आणि वैद्यकीय पथकांनी त्या दिवशी ३१ मृतदेह बाहेर काढले.






# तहसील कार्यालयातील भ्रष्टाचाराविरोधात विचारला प्रशासनाला थेट जाब

## वीरेंद्र जगताप आक्रमक



**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.5 )** – अमरावती जिल्ह्यातील तहसील कार्यालयातील कामचुकारपणा, भ्रष्टाचार आणि सामान्य जनतेकडे होणाऱ्या दुर्लक्षाविरोधात माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. तहसीलदारांच्या निष्क्रियतेबद्दल त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे थेट तक्रार दाखल करून प्रशासनाला जाब विचारला आहे.

जगताप यांनी स्पष्टपणे सांगितले की, संजय गांधी श्रावणबाळ योजनेचे अनुदान मागील चार महिन्यांपासून थांबले आहे, रोजगार हमी योजनेचा निधी सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. यासोबतच, बोगस बियाण्यांची विक्री, अवैध रेती तस्करी आणि इतर अनियमित गोष्टी प्रशासनाच्या आडदृष्टीमुळे बिनधास्त सुरू आहेत, असा आरोप त्यांनी केला. तहसील कार्यालयात अर्ध्याहून अधिक कर्मचारी नियमित अनुपस्थित राहत असल्यामुळे नागरिकांच्या अर्ज व फाईली महिनोंमहिने प्रलंबित राहतात. मात्र, तहसीलदारांकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने सामान्य जनतेत असंतोष वाढत आहे. कामचुकार अधिकारी आणि कर्मचारी स्वत:च्या पगारासाठी व कमिशनसाठी तत्पर असतात, मात्र जनतेच्या व्यथा दुर्लक्षित राहतात, अशी तीव्र टीका जगताप यांनी केली. सध्याचे आमदार निष्क्रिय असल्यामुळेच प्रशासन बेलगाम झाले आहे, असा स्पष्ट आरोपही त्यांनी यावेळी केला.

### तीव्र आंदोलनाचा इशारा

जर ही स्थिती अशीच राहिली, तर आम्ही तहसील कार्यालयातच घुसून आंदोलन करू, असा तीव्र इशारा देत जनतेच्या हक्कांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार जगताप यांनी केला. आजही जनतेचा विश्वास माझ्यावर आहे. पराभव झाला तरी मी हरलेलो नाही. एक लाख मतदारांचा पाठिंबा हीच माझी ताकद आहे, असे सांगत जगताप यांनी प्रशासनाला सावध केले. हा लढा जनतेसाठी आहे आणि तो थांबणार नाही, असेही ते ठामपणे म्हणाले.

# तहसील कार्यालयाच्या नव्या इमारतीचे काम कासवगतीने

## अपुऱ्या जागेमूळे नागरिकांमध्ये रोष



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.5 )**- दर्यापूर शहरातील तहसील कार्यालय हे नागरिकांसाठी अत्यंत महत्वाचे मानले जाते. मात्र, सध्या हे कार्यालय अपुऱ्या जागा व सुविधांमुळे अडचणीत सापडले आहे. वर्ग अकरावी प्रवेश प्रक्रियेमुळे कागदपत्रांसाठी हजारो विद्यार्थी व पालक तहसीलमध्ये गर्दी करत असून, त्यामुळे कार्यालयातील कामकाजावर ताण निर्माण झाला आहे. तहसील कार्यालयात कास्ट सर्टिफिकेट, नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, सातबारा उतारे, तसेच श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना यासारख्या महत्त्वाच्या शासकीय योजनांची अंमलबजावणी केली जाते. या सर्व सेवांसाठी नागरिकांना तहसील कार्यालयात यावे लागते. परंतु, सध्याचे कार्यालय पोलिस स्टेशनच्या मागे असलेल्या संकुचित जागेत कार्यरत असून, वाहनतळाचीही सुविधा उपलब्ध नाही. परिणामी, दुचाकी आणि चारचाकी रस्त्यावर उभ्या केल्याने वाहतूक कोंडी आणि परिसरातील नागरिकांचे हाल सुरू आहेत. ग्रामीण भागातून आलेले वयोवृद्ध नागरिक पहाटेपासूनच रांगेत बसून आपली कामे पूर्ण होण्याची वाट पाहत असतात. अनेकदा सर्व्हर डाऊन असण्याच्या कारणामुळे त्यांच्या प्रतीक्षेचा त्रास वाढतो. या समस्येमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे. दर्यापूर शहरातील अमरावती रोडवर एक भव्य नवीन तहसील इमारत बांधण्यात आली आहे. हे बांधकाम पूर्ण होऊन एक वर्षाचा कालावधी उलटून गेला, तरी अद्याप इमारतीचे रीतसर उद्घाटन झालेले नाही. विशेष म्हणजे, याच इमारतीत विधानसभा निवडणूक प्रक्रियाही उद्घाटनाशिवाय पार पडली होती.

### नवीन इमारत तात्काळ सुरू करा

दर्यापूरातील सामाजिक, राजकीय व नागरी क्षेत्रातील प्रतिनिधींनी नवीन तहसील इमारत तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी ही इमारत लवकरात लवकर सुरू व्हावी, असे ते सांगत आहेत.

### प्रशासनाने भान ठेवावे – अंकुश कावडकर

सद्यस्थितीत नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तहसील व उपविभागीय कार्यालयाचे अंतर दोन किलोमीटर असून, नागरिकांना पायपीट करावी लागते. प्रशासनाने याची दखल घ्यावी आणि नवीन तहसील इमारत तातडीने सुरू करावी, अशी मागणी युवा सेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी केली आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी 31 जुलैपर्यंत मुदतवाढ

## शेतकऱ्यांना आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** – प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम 2025-26 साठी जिल्ह्यातील शेतकरी सहभागास सुरुवात झाली आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांसारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण प्रदान करणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी भारतीय विमा कंपनीची निवड करण्यात आली असून, या योजनेमुळे पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित ठेवण्यास मदत होईल. विमा काढण्याची अंतिम मुदत 31 जुलै 2025 आहे. कृषी विभागामार्फत सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी 31 जुलैपर्यंत पिकाचा विमा काढून घ्यावा. योजनेबद्दल सविस्तर माहितीसाठी गावातील कृषी सहायक, मंडळ कृषी अधिकारी आणि तालुका स्तरावर तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

योजनेमुळे शेतकऱ्यांना नाविण्यपूर्ण आणि सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन मिळेल. कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे, अन्नसुरक्षा, पिकांचे विविधिकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकता वाढवणे हे या योजनेचे महत्त्वाचे हेतू आहेत. इतर व्यक्तींच्या नावाने, तसेच इतर अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईल. योजनेत सहभागासाठी शेतकरी ओळखपत्र क्र. (AGRISTACK Farmer ID) असणे अनिवार्य असेल आणि पीक विमा नुकसान भरपाईसाठी, ई-पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, 7/12, 8-अ, आधार कार्ड, बँक पासबुक, स्वयं घोषणापत्र यांचा समावेश आहे.

**विविध पिकांसाठी संरक्षित रक्कम आणि विमा हप्ता ( प्रति हेक्टर ) खालीलप्रमाणे**

**भात ( तांदूळ )**- विमा संरक्षित रक्कम 61 हजार, विमा हप्ता 152.50 रुपये, ख. ज्वारी- विमा संरक्षित रक्कम 32 हजार 900, विमा हप्ता 82.25 रुपये, सोयाबिन- विमा संरक्षित रक्कम 55 हजार 900, विमा हप्ता 559 रुपये, मूग- विमा संरक्षित 26 हजार 600 विमा हप्ता 532 रुपये, उडीद- विमा संरक्षित 25 हजार, विमा हप्ता 62.50 रुपये, तूर विमा संरक्षित 45 हजार 700, विमा हप्ता 457 रुपये, कापूस- विमा संरक्षित 60 हजार, विमा हप्ता -750 रुपये, मका -विमा संरक्षित 36 हजार, विमा हप्ता 90 रुपये.

सी. एस .सी केंद्रामार्फत अर्ज करण्यासाठी शेतकरी हिस्सा रक्कम प्रति हेक्टर या पेक्षा अतिरिक्त पैसे घेतल्यास शेतकऱ्यांनी कृषि विभाग, तहसिल कार्यालयास तक्रार करावी. जिल्हा कृषि अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा व तशी तक्रार नोंदवावी. असे आवाहन केले आहे.

## आसरा येथे वृक्षारोपण

**भातकुली** – तालुक्यातील आसरा येथे ग्रामपंचायतच्या सदस्या रंजना मुरलीधर लांडे यांनी जि.प.शाळा, दवाखा, अंगणवाडी, गुरांचा दवाखाना तसेच गावातील प्रमुख रस्त्यांवर जांभुळाची 33 झाडे लावली. विशेष म्हणजे 100 जांभूळची झाडे त्यांनी स्वत तयार केली होती.

# श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात शपथविधी समारोह



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.5 )** – वरुड तालुक्यातील लोणी येथील ग्रामीण भागातील एक उल्लेखनीय व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय याठिकाणी नव्या शैक्षणिक सत्रातील वर्गनायक व उपनायक शपथविधी समारोह नुकताच संपन्न झाला. या सोहळ्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास व्हावा यासाठी मतदान प्रक्रियेद्वारे सर्व वर्गांतील नायक व उपनायकांची निवड करण्यात आली. शपथविधी प्रसंगी सर्व नवनियुक्त प्रतिनिधींना त्यांच्या कर्तव्यांची, जबाबदाऱ्या व शिस्तीची शपथ दिली गेली. हा सोहळा संपूर्ण शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या साक्षीने पार पडला. वर्गनायक आणि उपनायकांची भूमिका म्हणजे वर्गातील अडचणी, मागण्या व समस्या वर्गशिक्षकांमार्फत शालेय प्रशासनापर्यंत पोहोचवणे, तसेच शाळेच्या कामकाजाविषयी सूचना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, ही अत्यंत महत्त्वाची असणार आहे.

# शाळेची दयनीय अवस्था पाहून गटशिक्षणाधिकारी स्तब्ध

## प्राचार्य रजेवर, शिक्षकांकडून माफीनामे

## शैक्षणिक अधोगतीला जबाबदार कोण ?





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** – नांदगाव पेठ येथील जिल्हा परिषद माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात नुकतीच गटशिक्षणाधिकारी वानखडे आणि केंद्रप्रमुखांनी अचानक भेट दिली. मात्र, शाळेची दयनीय अवस्था पाहून ते क्षणभर स्तब्ध झाले. वर्गखोल्यांची मोडकळीस आलेली स्थिती, मैदानाची दुर्दशा आणि शिक्षणाचा झालेला बट्ट्याबोळ यामुळे शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या दौऱ्यादरम्यान प्राचार्य देवेंद्र ठाकरे हे रजेवर असल्याचे निदर्शनास आले. यामुळे शाळेच्या कारभारात शिस्त व नियोजनाचा अभाव स्पष्टपणे दिसून आला. अनेक पालकांनी शिक्षक व प्राचार्यांच्या मनमानी कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला.

माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार यांच्या सूचनेवरून झालेल्या पाहणीत, शाळेला मिळालेल्या देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये आर्थिक अनियमितता असल्याचे संकेत मिळाले. वर्गखोल्या, स्वच्छता गृह, मैदान आदी सुविधांची अवस्था अत्यंत खराब असून, व्यवस्थापन पूर्णत: ढासळल्याचे दिसून आले.

शिक्षकांची अनुपस्थिती आणि वेळेचे भान नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असल्याची कबुली गटशिक्षणाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी सर्व शिक्षकांची खुलाशांसाठी पेशी घेण्यात आली. यामध्ये झालेल्या त्रुटींमुळे शिक्षकांकडून लेखी माफीनामे घेण्यात आले असून, भविष्यात अशा प्रकाराची पुनरावृत्ती होणार नाही, याचे लेखी आश्वासन देण्यात आले. गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. या वेळी सरपंच कविता डांगे, माजी जि.प. सदस्य विनोद डांगे, अभिजित बानासुरे, मनोज मोरे, अरुण राऊत यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्थानिक पालकांमध्ये संताप

विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो आहे, ही बाब लक्षात घेता पालक वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शाळेच्या व्यवस्थापनात पारदर्शकता यावी, शिक्षकांनी नियमितपणे उपस्थित राहावे आणि निधीचा योग्य वापर व्हावा, अशी पालकांची जोरदार मागणी आहे.

### विशेष लेखापरीक्षणाची मागणी

गावातील अनेक पालक आणि मान्यवरांनी शाळेसाठी आर्थिक मदत केली आहे. मी देखील शालेय साहित्यासाठी पाच हजार रुपयांची मदत केली होती. मात्र ती मदत खरोखर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली का, याबाबत शंका आहे. त्यामुळे वरिष्ठांनी महाविद्यालयाचे विशेष लेखा परीक्षण करून आर्थिक व्यवहारांची चौकशी करावी, अशी मागणी माजी जि.प. सदस्य नितीन हटवार यांनी केली आहे.



# दर्यापूरहून पंढरपूरसाठी दोन विशेष एसटी बस रवाना

## विठ्ठल दर्शनाची ओढ | वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि.5 )**- दरवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी एकादशीनिमित्त दर्यापूर एसटी आगारातून पंढरपूरसाठी दोन विशेष बस रवाना झाल्या. शहर व तालुक्यातील भाविकांनी मोठ्या उत्साहात यामध्ये सहभाग घेतला. फुलांच्या आकर्षक सजावटीत सजलेल्या या बसेस 30 जून रोजी सकाळी 10.30 वाजता दर्यापूरहून पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाल्या.

याप्रसंगी आगार प्रमुख आशिष बाहुलकर, सहाय्यक वाहतूक अधीक्षक अरविंद पोटदुखे, वरिष्ठ लिपिक स्नेहल अडगोकार, चालक विठ्ठल बैलमारे, नवीन जैन, वाहन निरीक्षक आशीष ऊखळकर, एकनाथ इंगळकर, नितेश शिरसाठ, पंकज कळसकर, राजेश कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी चालक-वाहकांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दर्यापूरहून पंढरपूरचे अंतर सुमारे 552 किलोमीटर आहे. खरिपाच्या पेरण्या आटोपून पावसाच्या काळजीपलीकडे जाऊन ग्रामीण भागातील शेकडो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरीच्या दिशेने रवाना झाले आहेत. बसस्थानक परिसरात उत्साहाचे व भक्तिभावाचे वातावरण पाहायला मिळाले. भाविकांची वाढती गर्दी पाहता आणखी बसगाड्यांची मागणी होत असून, आवश्यकतेनुसार वाढीव बसेस उपलब्ध करून दिल्या जातील, अशी माहिती आगार प्रमुख आशिष बाहुलकर यांनी दिली. एसटी महामंडळाच्या वतीने आषाढी यात्रेसाठी करण्यात आलेल्या या विशेष सेवेमुळे भाविकांची सोय तर झालीच, पण महामंडळाच्या उत्पन्नातही भर पडणार आहे.

## फळपीक विमा योजनेचा आज अंतिम दिवस

**अमरावती** – जिल्ह्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार 2025-26 अंतर्गत अर्ज करण्याची अंतिम मुदत 6 जुलै 2025 पर्यंत आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे फळपिकांचे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी ही योजना शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरणार आहे. जिल्ह्यासाठी भारतीय विमा कंपनीची निवड झाली असून, राज्य शासनाने या योजनेस दोन वर्षांसाठी (2024-25 आणि 2025-26) मान्यता दिली आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य टिकून राहील आणि त्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन मिळेल. संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, डाळिंब आणि सीताफळ या अधिसूचित फळपिकांसाठी ही योजना लागू आहे.

# राष्ट्रासाठी मध्यस्थी विशेष अभियान

## न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी मोहिम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** – अमरावती जिल्ह्यात न्यायालयीन प्रक्रियेवरील ताण कमी करून प्रलंबित प्रकरणांचा जलद निकाल लागावा, यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये 30 सप्टेंबर 2025 पर्यंत 90 दिवसांसाठी राष्ट्रासाठी मध्यस्थी ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीने संयुक्तपणे आखलेली ही मोहीम, सरन्यायाधीश न्या. भूषण गवई आणि न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविली जात आहे. या मोहिमेत वैवाहिक वाद प्रकरणे, अपघात दाव्यांची प्रकरणे, घरगुती हिंसाचाराची प्रकरणे, चेक बाउंस केसेस, व्यावसायिक वाद प्रकरणे, सेवा बाबी, गुन्हेगारी दंडनीय प्रकरणे (फौजदारी तडजोड प्राप्त नसणारी प्रकरणे सोडून), ग्राहक वाद प्रकरणे, कर्ज वसुलीची प्रकरणे, विभाजन प्रकरणे, निष्कासन प्रकरणे, जमीन अधिग्रहण प्रकरणे आणि इतर योग्य दिवाणी प्रकरणे मध्यस्थीद्वारे सोडविली जातील. यासाठी 40 तासांचे विशेष प्रशिक्षण घेतलेले मध्यस्थ कार्य करणार आहेत.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा आणि सचिव डी.एस. वमने यांनी सर्व वकील मंडळी आणि पक्षकारांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपली तडजोडप्राप्त प्रलंबित खटले, प्रकरणे या 90 दिवसांच्या विशेष मोहिमेमध्ये मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. तसेच प्रकरणांबाबत अधिक माहितीसाठी नजीकच्या संबंधित जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा.

# लहान मुलांची जिवीतहानी झाल्यास तुम्ही जबाबदारी घेणार का?

## मेहेरबाबा नगर, बँक कॉलनी, नेहा कॉलनी येथील संतप्त महिलांचा न.प. अधिकाऱ्यांना सवाल

### महिला धडकल्या चांदूर रेल्वे नगर परिषद कार्यालयावर





**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि.5 )** – चांदूर रेल्वे शहरातील मेहेरबाबा नगर, को-ऑपरेटीव्ह बँक कॉलनी, नेहा कॉलनी येथे गेल्या तीन वर्षांपासून रस्ते अतिशय खराब असून उघड्या नालीपासून सुद्धा नागरिक त्रस्त झाले आहे. याबाबत प्रशासन, लोकप्रतिनिधी, नेतेमंडळी यांना वारंवार विनंती, तक्रार करूनही कोणीही दखल घेत नसल्यामुळे अखेर या परिसरातील महिला शुक्रवारी (ता. 4) नगर परिषद कार्यालयावर धडकल्या. लहान मुलांची जिवीतहानी झाल्यास तुम्ही जबाबदारी घेणार का ? असा प्रश्न संतप्त महिलांनी न.प. अधिकाऱ्यांसमोर उपस्थित केला. यावेळी न.प. मुख्याधिकारी कार्यालयात हजर नव्हते.

मेहेरबाबा नगर, को-ऑपरेटीव्ह बँक कॉलनी, नेहा कॉलनी या परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असुन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. पावसाळ्याच्या दिवसात तर काही रस्त्यांवरून चालणेही कठीन झाले आहे. तसेच या परिसरातील उघड्या नालीमुळे नागरिक त्रस्त झाले आहे. नालीत विषारी सापांचे प्रमाण वाढले असुन यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. याशिवाय या परिसरातील विद्युत खांबावरील लाईट सुद्धा बंद आहे. भविष्यात या समस्यांमुळे जितीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तक्रारीची त्वरीत दखल घेऊन या परिसरातील नाली अंडरग्राउंड करण्यात यावी, पक्के रस्ते बांधण्यात यावे व खांबावरील लाईट चालू करण्यात यावे अशी मागणी या परिसरातील महिलांनी केली आहे. अन्यथा लहान मुलांना काही जीवितहानी झाल्यास याची जबाबदारी प्रशासनाची राहील असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदन देतेवेळी जयश्री जाधव, अश्विनी गाठे, अनिता राठोड, वंदना राऊत, अलका पूंड, अर्चना वाढोणकर, ललिता मंडलिक, विजया देऊळकर, तृप्ती ठाकरे, आरती टेकाडे, अर्चना टेकाडे, शिल्पा इंगोले, सोनाली गजभिये, स्मिता रंगारी, अनुराधा येंडे, घड्डीनकर, भावना चौधरी, कुसुम भरडे, प्रिति काकडे, काजल देशमुख, दिव्या देऊळकर, मंजुषा तांडेकर, अरुणा तांडेकर, वैशाली तांडेकर, शेख नाजेमा, कहेकशाँ शेख, प्रीती गोरडे, ललिता नानवटकर, जया फसाटे, प्रिया अलोणे, शीला घोडेस्वार, सुलभा अरमळ, शालिनी, शुभांगी वानखडे यांसह अनेक महिलांची उपस्थिती होती.

# वन्यप्राण्यांच्या हैदोसाने पिकांचे नुकसान

## शेतकऱ्यांचे मुख्य वनसंरक्षकांसह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.5 )**- या वर्षी वरुण राजा शेतकऱ्यांवर प्रसन्न असल्याने सुरळीत पावसामुळे पेरलेल्या बि-बियाण्यांचे वेळवरच रोपांमध्ये रुपांतर झाले. मात्र वन्यप्राण्यांनी मिळेल त्या मार्गाने शेतांमध्ये शिरुन या रोपांची तुडवण केली. परिणामी शेतकऱ्यांच्या लाखो रुपये किंमतीच्या बि-बियाण्यांचे नुकसान झाले. या संदर्भात शेतकऱ्यांचे मुख्य वनसंरक्षकांसह जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना निवेदन देण्यात आले.

याबाबत शेतकऱ्यांनी आ. रवी राणा यांचेकडे पाठपुरावा केला असता. %शेतकऱ्यांच्या पिक नुकसान भरपाईला आपला जाहीर पाठींबा असल्याचे वक्तव्य आ. रवि राणा यांनी व्यक्त केले. बडनेरा मतदार संघात येणाऱ्या %पार्डी (देवी), उदखेड, वडगाव जिरे,अऱ्हाड कुऱ्हाड, भानखेड, मोगरा, गोविंदपुर , भानखेड (खु) मोगरा, हातला, अमरापुर, कस्तुरा , वदड, मासोद, इंदला , पिंपळखुटा, कोंडेश्वर इत्यादी भागातील 4 हजार हेक्टर शेतजमीन पिकाअभावी विरान पडली आहे. या भागात विस्तृत वनक्षेत्र असल्याने वन्यप्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याकरिता वन्यप्राण्यांच्या व शेतजमीनीच्या संरक्षणार्थ वनविभागाने वनक्षेत्राकरिता तार कंपाऊडतर तर शेतीकरिता कंपाउंडची मागणीही आमदारांनी वनाधिकारी व मुख्य वनसंरक्षक अधिकाऱ्यांकडे केली आहे. शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई मिळाल्यास शेतकऱ्यांना दुबार पेरणी करता येईल. तसेच त्याचबरोबर वनक्षेत्र व शेतीकरिता संरक्षण कंपाउंडचे नियोजनही तेवढेच महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांकरिता याबाबींची पूर्तता वेळेवर झाल्यास 'युवा स्वाभिमान संघटना' आक्रमक पवित्रा घेणार असल्याचेही वक्तव्य युवा-स्वाभीमान संघटनेचे सर्वेसर्वा रवी राणा यांनी व्यक्त केले आहे. यावेळी निवेदन देताना युवा स्वाभिमान तालुका अध्यक्ष अजय घुले, उपाध्यक्ष उमेश डकरे, पार्डी सरपंच अक्षय मेश्राम, सरपंच मोगरा -कस्तूरा सुधाकर काळे, भानखेड (खु.) सरपंच नितनवरे, सरपंच भानखेडा (बु.) गुणवंत मेश्राम, उद्धवराव कराळे, मनोहर मारोडकर, प्रवीण अरक, दिलीप पाटिल, जगदीश अंबडकार अजाबराव गंगात्रे, सुरेश इंदाने व अंजनगाव बारी जि. प. सर्कल मधील सर्व शेतकरी मंडळी बहुसंख्येने उपस्थित होते.

महासागर

रविवार, दि. ६ जुलै २०२५

अमरावती



### श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात गुरुपौर्णिमा उत्सव

**अमरावती–** येथील रहाटगावमधील श्रीस्वामी समर्थ सेवा केंद्रात 7 ते 10 जुलै पर्यंत गुरु पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. 7 जुलै ते 9 जुलै पर्यंत तीन दिवसीय गुरुचरित्र पारायण होणार आहे. 10 जुलैला सकाळी 8 वाजता भूपाळी आरती, नंतर 10.30 वाजता नैवेद्य आरती, 11 वाजता महाराजांना गुरु करण्याचा संकल्प युक्त कार्यक्रम होणार आहे.



*अंजनगाव सुर्जी– आषाढी एकादशीनिमीत्त संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठल भक्तीत रंगलेला असताना, बाल वारकरीही कुठेच मागे नाही, अंजनगाव येथील शौर्य मोहोड हा आषाढी एकादशीच्या पुर्वसंध्येला असा वारकऱ्याच्या वेशभुषेत आपल्या पालकांकडून लहानपणापासून वारकरी संप्रदायाचे बाळकडू घेतांना टीपलेली एक मुद्रा.*

# पुन्हा अंधश्रध्देचा कहर : अवघ्या 22 दिवसांच्या बालिकेला दिले चटके

### दहेंद्री जवळील ढाणा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**चिखलदरा/ अचलपूर, ( दि.5 )–** मेळघाट हे जैवविविधतेने समृद्ध असले तरी आजही तेथे अंधश्रद्धेचा पगडा खोलवर आहे. शिक्षण व आरोग्य सुविधा असल्या तरी अनेक आदिवासी कुटुंबे मुख्य प्रवाहापासून वंचित आहेत. यामुळे आरोग्याच्या बाबतीतही अनेक ठिकाणी गैरसमज, अंधश्रद्धा व पारंपरिक पद्धतींचा अयोग्य वापर सुरु आहे. अशीच एक धक्कादायक घटना चिखलदरा तालुक्यातील दहेंद्री गावात घडली आहे, जिथे एका 22 दिवसांच्या बाळाला पोट फुगल्यामुळे चक्क लोखंडी सळईने चटके दिले गेले.

ही घटना धोंडू शेलुकर व रिचमु शेलुकर या दाम्पत्याच्या घरात घडली. त्यांच्या 15 जून रोजी जन्मलेल्या मुलीच्या पोटाला 25 जून रोजी सूज आली. त्याऐवजी वैद्यकीय उपचार घेण्याऐवजी गावातील 60 वर्षीय महिला मेंजो कासदेकर हिच्या सांगण्यानुसार डम्मा या अंधश्रद्धेच्या उपचारपद्धतीचा अवलंब करण्यात आला. या पद्धतीनुसार पोटावरील आजार बरे करण्यासाठी त्यावर चटके देण्याची चुकीची प्रथा अजूनही काही भागांत सुरू आहे. 27 जून रोजी मेंजो कासदेकर हिने या



नवजात बालिकेच्या पोटावर लोखंडी सळईने चटके दिले. नंतर आशा सेविका संगीत बेठेकर आणि गतप्रवर्तिका लता अलोकार यांनी ही घटना पाहून त्वरित वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांना माहिती दिली. वैद्यकीय अधिकारी ऐश्वर्या वानखडे यांनीही 30 जून रोजी भेट देऊन बाळाच्या उपचारासाठी आवश्यक ते सल्ला दिले. 4 जुलै रोजी बाळाला उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेमुळे पुन्हा एकदा स्पष्ट झाले की मेळघाट भागात अंधश्रद्धा अजूनही खोलवर रूजलेली आहे. अशा चुकीच्या उपचारांमुळे निरपराध बालकांचे आरोग्य धोक्यात येते. आरोग्य विभाग व स्वयंसेवी संस्थांनी जनजागृती मोहीम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याची गरज आहे. सरकारनेही या भागातील शैक्षणिक व आरोग्य सुविधा पोहोचवण्यावर भर देणे आवश्यक आहे, जेणेकरून अशा अंधश्रद्धेच्या घटना पुन्हा घडणार नाहीत.

#### गुन्हे दाखल

सध्या त्या बाळाची प्रकृती स्थिर असून, डॉ. प्रवीण परिसे (अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी) यांनी ही माहिती दिली. या प्रकरणावर चिखलदरा पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जादूटोणा आणि अघोरी प्रथा विरोधी कायदा, 2013 अंतर्गत कलम 118(1), 3(2) नुसार मेंजो कासदेकर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### उपचारानंतर घरी पाठविले

15 जून रोजी या बाळाचा दहेंद्री येथील आरोग्य उपकेंद्रावर जन्म झाला होता. त्यानंतर काही दिवसांनी गृहभेटीदरम्यान आशा सेविकेला या बाळाच्या पोटावर डब्बे दिले असल्याचे दिसून आले. त्यानंतर या बाळाला अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, सोनाग्राफीमध्ये बाळाला जास्त इजा झाली नसल्याचे स्पष्ट झाले, त्यामुळे उपचारानंतर बाळाला त्याच्या गावी ढाणा येथे पाठविण्यात आले. बाळाची प्रकृती आता स्थिर आहे.

**डॉ.सुरेश आसोले,**
**जिल्हा वैद्यकीय अधिकारी, अमरावती.**

# 450 लिटर दारूसह 2 लाखांचा मुद्देमाल जप्त

### एक्साईज विभागाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.5 )–** राज्यात मध्यप्रदेशातून अवैधपणे आणली जाणारी गावठी हातभट्टी दारूची वाहतूक रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत अमरावती विभागाच्या भरारी पथकाने वरूड तालुक्यातील भेमडी शिवारात छापा टाकून सुमारे 450 लिटर गावठी हातभट्टी दारू जप्त केली. या कारवाईत एकूण 2 लाख 8 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

भेमडी ते शेंदूरजना घाट रस्त्यावर दोन वाहनावर गावठी दारू वाहून नेली जात होती. दोन्ही वाहनांच्या मागील सीटवर नॉयलॉनच्या पोत्यांमध्ये बांधलेल्या 7 रबरी ट्युबमध्ये एकूण 450 लिटर गावठी दारू साठवून मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात आणली जात होती.

या प्रकरणी पोलिसांनी नितेश सोमलाल धुर्वे (वय 24) व सुरेंद्र मनसूख नरे (वय 23, दोघेही रा. धाना, उमरी ता. पट्टन, जि. बैतूल (मध्यप्रदेश) यांना अटक केली आहे. त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई डॉ. राजेश देशमुख (आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई) व प्रसाद सुर्वे (सहआयुक्त, मुंबई) तसेच डॉ. पराग नवलकर (प्रभारी विभागीय उपआयुक्त, अमरावती विभाग) व शशिकांत गर्जे (अधीक्षक, अमरावती) यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथक, अमरावती यांच्यातर्फे करण्यात आली.


सदर कारवाई संतोष पी. वायाळ (प्रभारी निरीक्षक) व आकाश जाधव (प्रभारी दुय्यम निरीक्षक) यांच्या नेतृत्वाखाली एस.एस. पेंढारकर, आर.पी. मोकलकर, पी.आर. भोरे, के.एम. मातकर, महिला जवान व्ही.बी. पारखी व डी.डी. मानकर यांनी संयुक्तपणे केली. या प्रकरणाचा पुढील तपास प्रभारी निरीक्षक संतोष वायाळ करत आहेत.

# पिस्टल हातात घेवून बनवला व्हिडीओ

### तरुणावर राजापेठ पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.5 )–** इंस्टाग्रामवर पिस्टलसह माफिया आया अशी धक्कादायक रील बनवून समाजात दहशत निर्माण करणाऱ्या तरुणावर राजापेठ पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. ही रील नवाथे चौक येथील तापडिया मॉल परिसरात चित्रीत करण्यात आली होती. या व्हिडीओमुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

तापडिया मॉलच्या व्यवस्थापक संजय मांगो यांनी संबंधित व्हिडीओविषयी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली डिटेक्टिव्ह शाखेचे प्रमुख पोलिस हवालदार मनीष करपे यांनी तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या मदतीने



व्हिडीओतील इसमाची ओळख पटली आणि ओम सागर जाधव (रा. अमरावती) याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने व्हिडीओमध्ये तोच असल्याचे कबूल केले. त्याच्या मोबाईलवरील इंस्टाग्राम खात्यावर सदर व्हिडीओ आढळून आला. पोलिसांनी पिस्टलबाबत विचारणा केली असता ती फक्त प्लास्टिकची खेळण्याची बंदूक असल्याचे उघड झाले. तरीदेखील, समाजात भीती पसरवणारा प्रकार असल्यामुळे संबंधित बंदूक जप्त करून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली.राजापेठ पोलिसांनी युवकांना इशारा दिला आहे की, अशा प्रकारचे व्हिडीओ बनवून समाजात दहशत निर्माण करू नये.

असे प्रकार निदर्शनास आल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भवर यांचे मार्गदर्शन लाभले. कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट, पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, पोलिस हवालदार मनीष करपे, पंकज खटे, रवी लीखीतकर, विजय राऊत, सागर भजगवरे आणि अर्जुन कदम सहभागी होते.

# 17 जुलैला संपूर्ण विदर्भातील परमीट रुम व बार बंद ठेवण्याचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )–** विदर्भातील सर्व 11 जिल्ह्यांमधील परमीट रुम आणि रेस्टॉरंट व्यवसायिकांनी 17 जुलै रोजी एकत्रित बंद पुकारण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भ परमीट रुम रेस्टॉरंट असोसिएशनच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या दिवशी सर्व परमीट रुम व बार पूर्णपणे बंद राहणार आहेत.

रेस्टॉरंट व बार चालकांनी वाढत्या परवाना शुल्क, नूतनीकरणातील अडथळे, शासनाच्या अनियमित धोरणांमुळे उद्भवणाऱ्या अडचणी यांचा निषेध केला. त्यांनी सांगितले की, अमरावती जिल्ह्यातच मागील 2 वर्षांत 24 बार परवाने बंद झाले आहेत. तर राज्यभरात 10 वर्षांचा लायसन्स शुल्क एकदम मागण्याच्या शासनाच्या धोरणामुळे अनेक बार चालक अडचणीत आले आहेत. बार चालकांनी सांगितले की, परमीट रुम व बार चालवणे आता तोट्याचे झाले आहे. सातत्याने होणाऱ्या तपासण्या, शासनाच्या कारवाया आणि लायसन्स नुतनीकरणात होत असलेला विलंब यामुळे व्यवसाय धोक्यात आला आहे. दुसरीकडे कमी दरात मिळणाऱ्या देशी-गावठी दारूच्या विक्रीकडे लोक वळत आहेत. शासनाने जर धोरणे बदलून रेस्टॉरंट व बार व्यवसायासाठी सुलभता आणली नाही, तर आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही असोसिएशनतर्फे देण्यात आला आहे. पत्रपरिषदेत नितीन मोहोड, लकी नंदा, अनिल तरडेजा, मदन जयस्वाल, गजानन राजगुरे यांच्यासह आदींचा समावेश होता.

# वाघाट्याची भाजीने फिटतील आषाढी एकादशीचे पारणे





***नितीन दुर्बडे***
***पथ्रोट – आषाढी एकादशीच्या आध्यात्मिक वातावरणात, वारकरी संप्रदायाचा उत्साह आणि उपवासाचे महत्त्व यांचे अद्वितीय मिश्रण पाहायला मिळते. उपवासानंतर द्वादशीला उपवास सोडताना जे अन्न ग्रहण केले जाते, ते शरीराला संतुलित करावे, पचनास मदत करावी आणि आरोग्य सुधारावे, अशी पारंपरिक संकल्पना आहे.***

#### आरोग्यदायी गुणधर्म

वाघाटी ही फक्त चवीलाच नव्हे, तर आयुर्वेदिक दृष्टिकोनातून आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. याच्या फळांबरोबरच पाने आणि मुळे देखील वापरली जातात.

#### वाघाटीचे काही औषधी उपयोग

- पचन सुधारते, पित्तशामक आहे
- श्वसनाशी संबंधित तक्रारींवर उपयोगी
- विषारी द्रव्ये पोटात गेल्यास मळमळ व उलट्या थांबवते
- सर्दी, खोकला, ताप, कृमी या आजारांवर प्रभावी
- लहान मुलांमध्ये वारं पोटात अडकण्याने होणाऱ्या दुखण्यावर उपयुक्त
- अंगदुखी, सूज, डोकेदुखीवर गुणकारी

## औषधी गुणांनी भरलेली पारंपरिक चव

#### पारंपरिक उपवास आणि वाघाटीचे नाते

वाघाटी, जीला काही ठिकाणी गोविंदफळ असेही म्हणतात, ही झाडावर फुलणारी एक दुर्मिळ फळभाजी आहे. उपवासाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे द्वादशीला वाघाटीची भाजी खाणे ही पूर्वापार चालत आलेली परंपरा आहे. विशेष म्हणजे, ही फळे फक्त याच काळात झाडावर तयार होतात आणि नंतर बाजारात विक्रीसाठी येतात. वाघाटीची चव किंचित कडवट असूनही, तिच्या औषधी गुणधर्मामुळे ती उपवास सोडताना सर्वोत्तम मानली जाते.

#### वाघाटीचा वेल – आता दुर्मिळ

पूर्वी शेतांच्या बांधावर, परसबागांमध्ये आणि ओढ्यांच्या काठांवर सहज दिसणारा वाघाटीचा काटेरी वेल आता मात्र शहरीकरणाच्या वेगामुळे नामशेष होत चालला आहे. वाढत्या वृक्षतोडीमुळे या वेलाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे. त्यामुळे सध्या बाजारात वाघाटीची किंमत 100 ते 200 रुपये किलोपर्यंत पोहोचली आहे. या वनस्पतीच्या संवर्धनाची आवश्यकता आता अधिक तीव्रतेने भासते.

#### लोकपरंपरेतील वाघाटी

वाघाटी या फळाचे महत्त्व लोकपरंपरेत सुद्धा दिसते. आषाढी एकादशीच्या ओव्या, दळणकांडाच्या गाण्यांमध्ये आणि मौखिक परंपरेत वाघाटीचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो.

अशा वेळी एक विशेष भाजी प्रत्येक घराघरात हजेरी लावते ती म्हणजे वाघाटीची भाजी, जी या काळात औषधी गुणांनी युक्त असल्यामुळे अनन्यसाधारण महत्त्वाची ठरते. या वाघाट्याची भाजीने आषाढी एकादशीचे पारणे (अलौकिक अर्थाने पारणे फिटणे म्हणजे उपवासाची सांगता करून भोजन ग्रहण करणे) फिटतील.



#### ऐतिहासिक संदर्भ

1903 साली प्रकाशित 'फ्लोरा ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी' या पुस्तकात वाघाटीची नोंद सापडते. तसेच संत रामदास स्वामी यांनी त्यांच्या ओव्यांमध्ये 300 प्रकारच्या वनस्पतींचा उल्लेख केला आहे, ज्यात वाघाटीचा समावेश आहे. ही वनस्पती नैसर्गिक जैवविविधतेचा भाग असून, फुलपाखरांच्या जीवनचक्रातही वाघाटी महत्त्वाची भूमिका बजावते.

#### संवर्धनाची गरज

वाघाटीच्या वेलाचा प्रसार मानवनिर्मितीने शक्य नाही; तो केवळ नैसर्गिकरीत्या वाढतो. त्यामुळे पुढच्या पिढीला वाघाटीची ओळख करून देण्यासाठी संग्रह, संवर्धन आणि माहिती प्रसार यावर भर देणे आवश्यक आहे. या औषधी वनस्पतीची माहिती शाळांमधून, वारकरी संप्रदायातून आणि पारंपरिक शिबिरांमधून दिली गेल्यास, याचे महत्त्व टिकून राहू शकते.

#### उदाहरणार्थ

**आषाढी एकादशी माझ्या**
**विठ्ठल लालाला,**
**रुक्मिणी लावी शिडी**
**वाघाटीच्या वेलाला।**

या ओवांमधून वाघाटीच्या झाडावर चढण्यासाठी शिडी लावावी लागते, इतके ते दुर्गम ठिकाणी वाढते, हे सूचित होते.

द्वादशीला आलेल्या पाहुण्यांना गोडाऐवजी वाघाट्याचा कडवट रस द्यावा, ही देखील एक प्राचीन समज आहे. कारण उपवासानंतर शरीरात पित्त वाढते, आणि वाघाटी हे औषधी फळ त्यावर नियंत्रण ठेवते.

# तीन तासांत डिझेल व कॅपेसिटर चोरी प्रकरणी आरोपी अटकेत

### गुन्हे शाखा युनिट एकची यशस्वी कारवाई | 6 हजारांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 ) –** नांदगावपेठ पोलिस ठाणे हद्दीतील मोबाईल टॉवरवरून जनरेटरमधील डिझेल आणि कॅपेसिटर चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने केवळ तीन तासात अटक केली. आरोपींच्या ताब्यातून 6 हजार रुपये किंमतीचा कॅपेसिटर जप्त करण्यात आला असून, डिझेल विकल्याची कबुली त्यांनी दिली आहे. पोलिसांनी आता डिझेल खरेदीदाराचा शोध सुरू केला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अरुण ऊर्फ दिनेश लक्ष्मण ठवरे (27) आणि तिलक जयप्रकाश बंगय्या (25), दोघेही रा. खैरय्या नगर, अमरावती अशी आहेत. बोरगाव धर्माळे मार्गावरील जिओ मोबाईल टॉवरवरील जनरेटरमधून त्यांनी 6 हजार रुपये किंमतीचा मॉड्यूल सुपर कॅपेसिटर (190 एफ) आणि 9 हजार 170 रुपयांचे डिझेल चोरले होते. याप्रकरणी टॉवर व्यवस्थापक महेश गजानन ठाकरे (31, रा. अमरावती) यांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला होता. गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे आरोपींना ताब्यात घेतले आणि चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून कॅपेसिटर जप्त करण्यात आला असून, डिझेल विक्रीबाबत अधिक तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, पीएसआय प्रकाश झोपाटे आणि त्यांच्या पथकातील सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाले, इत्यादींच्या प्रयत्नातून पार पडली.

# 22 वर्षीय युवकाची छत्री तलावात उडी घेऊन आत्महत्या

### केडिया नगर परिसरात हळहळ

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 ) –** शहरातील केडिया नगर आणि आदिवासी नगर परिसरात राहणाऱ्या विजय इंद्रजीत इंगळे (वय 22) या युवकाने छत्री तलावात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, राजापेठ पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

विजय इंगळे एमआयडीसी भागातील एका खासगी कंपनीत



काम करत होता. गेल्या काही दिवसांपासून तो एकटाच राहत होता. 1 जुलै रोजी रात्री 9 वाजता तो घराबाहेर गेला आणि नंतर एका शेजाऱ्याच्या फोनवर माझी वाट बघू नका, मी आता घरी येणार नाही असे सांगून संपर्कातून गेला. त्यानंतर कुटुंबीयांनी आणि नातेवाइकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो कुठेही सापडला नाही. 2 जुलै रोजी विजयची मोटरसायकल छत्री तलावाजवळ आढळून आली. यामुळे त्याचा तलावात शोध घेण्यात आला, पण कोणतीही ठोस माहिती मिळाली नाही. 3 जुलै रोजी सकाळी, मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांना विजयचा मृतदेह छत्री तलावात आढळून आला. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे. आत्महत्येमागील कारण अद्याप अस्पष्ट असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अंजनगावचे महान संत श्री रुपलाल महाराज

आज आषाढी एकादशी या एकादशीला देवशयनी एकादशी असेही संबोधले जाते. हा महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यातील हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण आहे. हा दिवस भगवान विष्णूंच्या निद्रावस्थेचा काळ मानला जातो, जो चातुर्मासाच्या सुरुवातीस येतो. या दिवशी वारकरी भक्तीभावाने पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जातात. बऱ्याच पायी पालखी सोहळ्यात हजारो लोक विठ्ठलाच्या भक्तीत लीन होतात. यामध्ये अंजनगाव सुर्जी मधुन पंढरपूरला दरवर्षी पायी पालखी सोहळा आयोजित करण्यात येतो. पंढरपूर येथील संत रुपलाल महाराज मठमध्ये ही पालखी आषाढी एकादशी पूर्वी पोहोचते. महाराष्ट्र संतांचे राज्य म्हणून ओळखले जाते. येथे असंख्य संत-महापुरुष होऊन गेलेत. त्यामध्ये संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर, संत गोरोबा कुंभार, संत सावतामाळी, संत एकनाथ महाराज, संत चोखोबा यामध्ये विदभार्तील संत गजानन महाराज, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज व वैराग्यमुर्ती संतश्री रुपलाल महाराज. याशिवाय बरेच संत होऊन गेले सर्व संतांनी समाज जागृतीसाठी प्रयत्न केलेले आढळतात.

---

**आषाढी एकादशीचे धार्मिक महत्व :**
आषाढी एकादशीला देवशयनी एकादशी असेही म्हणतात. या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यांच्या निद्रावस्थेत जातात, असे मानले जाते.

**आषाढी एकादशीचे आध्यात्मिक महत्व :**
या दिवशी उपवास, भजन, कीर्तन आणि विठ्ठलाच्या नामाचा जप करणे अत्यंत शुभ मानले जाते. जे भक्तगण पंढरपूर जाऊ शकले नाही ते गावातील जवळच्या विठ्ठल मंदीर मध्ये मोठया श्रध्देने दर्शन घेतात.

**आषाढी एकादशीचे पंढरपूरची वारी :**
आषाढी एकादशीला महाराष्ट्रातून लाखो वारकरी पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी दिंडी (पालखी) घेऊन जातात. हा महाराष्ट्र राज्यातील सर्वांत मोठा उत्सव असतो.

**आषाढी एकादशीचे चातुमार्साचा प्रारंभ :**
आषाढी एकादशीपासून चातुर्मास सुरू होतो, ज्यामध्ये अनेक धार्मिक कृत्ये केली जातात.

**आषाढी एकादशी साजरी करण्याची पद्धतः**
उपवासः या दिवशी उपवास करणे अत्यंत महत्वाचे मानले जाते. आरोग्य चांगले राहण्यासाठी उपवास सर्वोत्तम मार्ग आहे. कोणत्याही आजारासाठी उपवास केल्याने फायदा होतो. म्हणून प्रत्येक एकादशीला सर्वांनी उपवास करावे.

**विठ्ठल-नामाचा जप :**
विठ्ठलाच्या नामाचा जप करणे, भजन-कीर्तन करणे आणि आध्यात्मिक कृत्ये करणे. पंढरपूरला जाणे, जवळच्या विठ्ठल मंदीरमध्ये जाणे, चांगले शुद्ध विचार ठेवणे.

**पंढरपूरची वारी :**
वारकरी मोठ्या भक्तीभावाने पंढरपूरला पायी दिंडीने जातात. यामध्ये त्यांना विठ्ठल भेटतो मग तो कोणत्याही रुपात - स्वरूपात येऊ शकतो. ज्या प्रमाणे माणसात देव आहे असे संत गाडगेबाबा सांगून गेले. मग सर्वांसोबत चांगले वागून आपण विठ्ठलाला भेटू शकतो.

**संत गाडगेबाबांची पानमळयात भेट :**
आपल्या परिवारात छान रमलेले असतांनाच पारिवारिक जबाबदारी प्रमाणे संत रुपलाल महाराज पानमळा लावायचे व आपला उदरनिर्वाह करायचे, नंतर एकदा गाडगेबाबा या परिसरात स्वच्छता करता-करता पोहचले.

बाबांच्या पानमळ्यात गाडगेबाबा आले असता गाडगेबाबांनी जीवनाचा अर्थ समजावून सांगितला, जीवनासंदर्भात भरपूर मार्गदर्शन केले, जीवनाची व्याख्या सांगितली, त्याचप्रमाणे संत रुपलाल महाराजांनी गाडगेबाबांच्या म्हणण्याप्रमाणे पुढील जीवनाची दिशा बदलवून टाकली आणि वैराग्य पत्कारले. त्यानंतर ते पंढरपूरला गेले.

पुढे १२ वर्ष हिमालयात तपासाठी गेले. परत आल्यानंतर चारधाम भ्रमण केलेत. आपल्या पहूर या गावात सप्ताहासाठी पोहचल्यानंतर गोपीचंदाप्रमाणे पत्निला भिक्षा मागीतल्याचा प्रसंग आहे. गाडगेबाबा प्रमाणेच श्री संत रुपलाल महाराज दिवसभर गाव स्वच्छ करायचे व रात्री लोकांचे मन आपल्या मधूर वाणीतून स्वच्छ करायचे. भ्रमण करतांना ते पुढे अंजनगाव सुर्जीला आले.



संत महापुरुष खुप तेजस्वी, ओजस्वी असतात. त्यांच्या संगतीने सर्व जनता सुखावते.

संत रुपलाल महारांच्या चेहऱ्यावर भरपूर तेज होते. पांढऱ्या रंगाची वाढलेली दाढी, वर्ण गोरा, उंची ६ फुट, भगवे कपडे व लुंगी परिधान करत असणारे बाबा सतत वडाच्या झडाखाली नामस्मरण करत बसायचे. त्यांनी उभारलेले पान अटाई रोडवरील विठ्ठल मंदिराचे महात्म्य एका वेगळ्याच अस्मितेचे दर्शन घडविते.

या मंदिराचे भव्य बांधकाम, यामध्ये सर्व देवी-देवतांच्या मोठ-मोठ्या मुतीर्मुळे मन मोहून टाकते. जणू विविध मंदीर एकत्र आणले की काय अशी अनुभूती येते. यात सर्वात महत्वाचा असा सोन्याचा वाटा आहे ज्याने या मंदिरात सर्व श्रद्धाळूंना नतमस्तक करण्यास विवंचित केले आणि ते म्हणजे श्री संत रुपलाल महाराज.

महाराजांनी केलेली कामगिरी, लोकांना केलेली मदत, मार्गावरुन भटकलेल्यांना योग्य मार्ग दाखविने आणि सर्व भाविकांना सतत मार्गदर्शन करुन सुखाने जगण्याची दिशा दाखविली. आज ते सर्व भक्तगण सुखी व समाधानी आहेत.

**संत रुपलाल महाराज समाधी स्थळ :**
या मंदिराला श्री विठ्ठल मंदिर संस्थान म्हणूनच संबोधले जाते. संत रुपलाल महाराज यांच्या समाधी नंतर या स्थळाला समाधी मंदिर संबोधल्या जाते आहे. विठ्ठल मंदिरातील पायरीजवळ बाबांची समाधी उभारलेली आहे.

**शासनाकडून संत रुपलाल महाराजांचे स्मारक जाहीर :**
मागील वर्षी अर्थसंकल्पात संत रुपलाल महाराज यांचे भव्य राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी तसेच बारी समाज बांधवांच्या आर्थिक तसेच शैक्षणिक उत्थानासाठी संत रुपलाल महाराज यांच्या नावाने आर्थिक महामंडळ स्थापन केले जाणार असल्याचे अर्थसंकल्प मांडत असताना जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार खोडगाव रोड वरील एका खुल्या जागेत हे स्मारक तयार होणार आहे.

**संत रुपलाल महाराजांची गौरक्षण सेवा :**
बाबा मुक्या प्राण्यांची सेवा करायचे आणि त्यांच्या कडे बैल जोडी, गाय, कुत्रा असे प्राणी होतें. त्यांची गौरक्षण सेवा करण्याकडे जास्त ओढ होती.

**विठ्ठल मंदिरातील विहिरीचे महात्म्य :**
त्यांचे अंजनगाव मध्ये भरपूर भक्तगण झाल्यानंतर त्यांनी सवार्नूमते एक मंदीर उभारण्याचे ठरविले. त्यानूसार मंदिराची उभारणी झाली. नंतर येथे एका रात्रीमध्ये विहीर बांधण्यात आली.

या विहीरीला अष्टमाहासिद्धीचे महात्म्य प्राप्त झालेले आहे. या विहीरीतील पाण्याने आंघोळ केल्यास पापांचा नाश होतो, रोगराई दूर होते. येथे लहान मुलांची आंघोळ केल्यास मुलांचे आरोग्य चांगले राहते.

**संत रुपलाल महाराजांची समाधीः**
पंढरपूर मधील विठ्ठल मंदीर मधील संत नामदेव महाराजांच्या पायरी प्रमाणे संत रुपलाल बाबांच्या इच्छेप्रमाणे अंजनगाव मधील विठ्ठल मंदिराच्या प्रथम पायरीजवळ त्यांची समाधी बांधण्यात आली. आज संपूर्ण महाराष्ट्रातून या ठिकाणी भक्तगण येतात.

**पुण्यतिथी निमित्त भव्य सोहळा :**
दरवर्षी भव्य स्वरुपात पुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात येत असतो. भव्य शोभायात्रा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. श्रीमदभागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह मध्ये कथा प्रवक्ता राष्ट्रीय कथा वाचकांचे व्यासपीठ असते.

सुमधुर वाणीतुन आणि कथेप्रमाने झांकी साकारल्यामुळे या संगीतमय कथेमध्ये भक्तगण चांगलेच रमुन जात असतात. भागवत कथा रात्रीला असल्याने सर्व भक्तगण आपले काम, नोकरी करुण मोठ्या संख्येने उपस्थित होतात. सोबतच रोज दुपारी ज्ञानेश्वरी परायनाचे वाचण आणि शेवटी काल्याचे कीर्तन केलें जाते. यापर्वावर संपूर्ण मंदिराला आकर्षक रंग लावल्याने सर्व देवी-देवतांच्या मूर्ती मध्ये प्राण आल्याचे निदर्शनात येते.

**श्री संत देवनाथ महाराज परंपरा भेट :**
पुर्वीपासून श्री संत देवनाथ महाराज परंपरा मधील पिठासिन संत भेटीला येत असतात. आता पण नित्य नियमाने श्रीमद्धागवत सप्ताह सोहळा सुरू असतांना जनतेला धार्मिक मार्गदर्शन आयोजित केले जाते.

■ ■ ■



डॉ नंदकिशोर अरुण पाटील
अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती
९२७३६६३०३२, ९१७५५१८०७४
drnandkishorpatil2019@gmail.com

(लेखक हे अनेक इतिहास व धार्मिक पुस्तकांचे लेखक व मानवसेवा पॅरामेडिकल कॉलेजचे संचालक आहेत.)

### श्री संत रुपलाल महाराजांची आरती

आरती रुपलाल बाबाची,
ब्रम्हभूत जननी विरत्काची...

नमो जय संत जनक जननी,
देवकी नंदन गोपाला
जन्मस्थान पहूर हे बोला,
शामजी नंदन रुपलाल
सत्य संसारी तपी कैवल्यपदी,
निष्कर्म योगीयाची ॥१॥

गाडगे संत तुम्हा भेटी,
आले पान मळ्या माजी
करविला बोध ब्रम्ह, जिविता,
जाहला त्याग अंगी भरता
सोडूनी मोट, निघाले थेट,
मोडली खोड प्रपंचाची ॥२॥

व्रत वैकल्य स्नान गंगा,
चर्चूनी भस्म अंगी खचले
तपाला हिमालयी बसले,
स्वतःनिरहार बळे सुकले
तरी अखंड यत्न अष्टांग,
मुर्ती ही भासे भगीरथाची ॥३॥

संसार सारुनी बा घेतला,
वेष अगम देशेसी
आले चारी धाम भ्रमूनी,
बोलीले स्वामी कांतेसी
माई भिक्षान्न घाली कोरान्न,
फेरी जणू गोपीचंदाची ॥४॥

एक शत यज्ञ पूर्ण करुनी,
परिसला मानवता धर्म
करावी गौरक्षण सेवा,
वचन रघूकुल शिस्त कर्म
राजा हरिश्चंद्र, कुणी योगेंद्र,
तापसी पुराण पुरुषाची ॥५॥

अंजनगावी आश्रमाला आले,
अष्टमहासिद्धी सुप्तगंगा
आणीले योग बळे विहीरी,
करविते पाप दोष भंगा
भक्त प्रल्हाद म्हणे श्रीरंगा,
यावे सतसंगा आषाढी एकादशी सरशी ॥६॥

# शेतीच्या उत्पन्नातून सोनं खरेदी केल्यास इन्कमटॅक्स लागतो का?

### सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.




नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात आपण आजपण सोन्याबद्दलची नवीन माहिती घेणार आहोत. आज महत्वाचे आपण बघणार आहोत की, शेतीच्या उत्पन्नातून घेतलेल्या सोन्यावर इन्कमटॅक्स लागेल का ?

**प्रश्न :** मिस्टर रामराव यांना खूप शेती असून, ते एक शेतीनिष्ठ शेतकरी आहेत. रामराव यांना फक्त शेतीचे भरमसाठ उत्पन्न असून, ते एक दमडीसुद्धा इन्कमटॅक्स भरत नाहीत. त्यांनी सोनं खरेदी केल्यास त्यांना इन्कमटॅक्स भरावे लागेल का?

■ वरील प्रश्न अत्यंत महत्वाचा तथा व्यहारात प्रत्येक शेतकऱ्याचा असू शकतो. भारत शेती प्रधान देश आहे आणि भारतीय नागरिकांना सोन्याचे वेड आहे. त्यात शेतकरी व त्यांच्या महिला सुद्धा अपवाद नाहीत.

वरील उदाहरणात रामरावांचे उत्पन्न भरमसाठ असले तरी ते फक्त शेतीनिष्ठ शेतकरी आहेत. त्यांना शेतीशिवाय दुसरे कुठलेच उत्पन्न नाही. त्यांनी खूप सोनं खरेदी केल म्हणजे त्यांना इन्कमटॅक्स लागेल, असे काही नाही. त्यांनी शेतीच्या उत्पन्नातून सोनं खरेदी केल्याचा त्यांना पुरावा मात्र ठेवावा लागेल.

**प्रश्न :** वरील उदाहरणात सोन्याच्या खरेदीबद्दल इन्कमटॅक्स अधिकारी दुसरे काही प्रश्न विचारू शकतात का?

■ शेतीच्या उत्पन्नातून सोनं खरेदी केल्यास पुराव्या व्यतिरिक्त इन्कमटॅक्स अधिकारी शेतकरी रामराव यांना काहीच विचारणार नाही. इन्कमटॅक्स विभाग कोणतेच प्रश्न विचारून अशा शेतकऱ्यास परेशान करण्याचा अधिकार त्यांना नाही.

**प्रश्न :** सी.बी.डी.टी. परिपत्रका प्रमाणे सोन्याचे नाणे, बिस्कीट इत्यादींना माफी मयार्दा लागु नाही. सोनं दागिन्याच्याच स्वरुपात असणे आवश्यक आहे; मग शेतकऱ्यांना सुद्धा हाच नियम लागू आहे का?

■ वरील प्रश्न अत्यंत संवेदनशील व महत्वाचा आहे. याची माहिती असणे खूप फायद्याचे आहे. आपण मागील लेखांच्या चर्चेत गेलो तर असे दिसते की सोनं हे मर्यादित तथा दागिन्याच्या स्वरुपात असावे. परंतु इथे आनंदाची गोष्ट अशी आहे की वरील उदाहरणातील रामराव सारख्या शेतकऱ्यांना हा नियम लागु करता येणार नाही.

रामराव यांच्याकडे जरी भरमसाठ सोनं खरेदी असली तरी त्यांचे फक्त शेतीचेच उत्पन्न असून, तेही भरमसाठ असल्यामुळे त्यांना हा नियम प्रत्यक्षपणे लागु होत नाही. त्यांनी शेतीच्या उत्पन्नातून सोनं खरेदी केल्यामुळे त्यांना सोनं कोणत्याही फार्म मध्ये खरेदी करता येईल असे सोप्याभाषेत बोलले तरी चुक ठरणार नाही. सी.बी.डी.टी. सर्क्युलर अशा सोन्याच्या खरेदीला लागु राहणार नाही, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

पुढील लेखमालेत आपण सोन्याबद्दलची माहिती चा अभ्यास करणार आहोत की सोन्याच्या वाढलेल्या किमतीवर इन्कमटॅक्सवाले टॅक्स लावू शकतात का? इत्यादी. ज्या वाचकांच्या प्रतिक्रिया, सुचना किंवा प्रश्न असतील त्यांनी आपल्या पूर्ण नावासह 9422218428 या फोनवर व्हॉटस्ॲप करावे ही विनंती.

# कानडा राजा पंढरीचा !

महाराष्ट्रात धर्माला फार महत्त्व दिले जाते. धर्मतेज जागवणारा पंढरीचा विठोबा हा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक राज्यांच्या सीमेवर आहे. काही जण म्हणतात, हा धनगरांचा देव आहे. हा मूळ आदिम (आदिवासी), अ-नागर देवच पुढे धनगरांसह पंडरिगे या गावी आला आणि पुढे तो पांडुरंग झाला.

पंडरिगे या गावाची पंढरी झाली. पूर्वी तेथे धनगरांच्या वस्त्या होत्या; परंतु नंतर नागरवस्तीमुळे पुढे या पंढरीला पंढरपूर या नावाने संबोधण्यात येऊ लागले. अशा रितीने पंढरीचे पंढरपूर झाले.

पुंडलिकाच्या वेळी पंढरपूरला स्थापन झालेली पांडुरंगाची ही मूर्ती पुढे कर्नाटकातील विजयनगरच्या राजाने त्याच्या साम्राज्यात नेली. त्याने त्या मूर्तीचा तुंगभद्रेच्या तिरावर स्थापना केली. त्या काळी महाराष्ट्रातील पैठण येथील संत भानुदास (संत एकनाथ महाराज यांचे आजोबा) हे विठ्ठलाचे मोठे भक्त होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता.

एकदा विठ्ठलाने प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत दिला आणि मी कर्नाटकात आहे. तू मला पंढरपुरात नेऊन माझी स्थापना कर, असे त्यांना सांगितले. विठ्ठलाने सांगितल्याप्रमाणे संत भानुदास यांनी विजयनगरच्या राजाकडे जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीची मागणी केली. राजालाही दृष्टांत झाला होता. त्यामुळे संत भानुदासांचे विठ्ठल प्रेम आणि भक्ती पाहून राजाने ती मूर्ती त्यांना दिली. संत भानुदासांनी ती मूर्ती पंढरपूरला आणून तिची प्रतिष्ठापना केली.

पांडुरंग हा शैव आणि वैष्णव दोघांचाही देव आहे. याला शैव आणि वैष्णव दोघेही भजतात. शैव पंथीय पांडुरंगाला वीरभद्र म्हणजेच विठ्ठल म्हणतात, तर वैष्णव त्याला गोपाळकृष्ण असे म्हणतात. तो विष्णु आणि शिव यांचा अवतार आहे; म्हणूनच तो हरिहर आहे. असा हा पांडुरंग श्रीकृष्णाचाच अवतार आहे.

काही जण विठ्ठल हा भगवंताचा नववा अवतार बुद्ध आहे, असेही म्हणतात. (आद्यशंकराचार्यांच्या काळात भारतात काही नवीन धार्मिक प्रवृत्तींचा उदय होऊन जैन, बौद्ध इत्यादी धर्मपंथ उदयास आले होते. महाराष्ट्रातही बौद्ध धर्माचा प्रभाव असल्याचे दिसून येते; कारण कोकण किनारपट्टी, घाटमाथा, मराठवाडा येथील सह्याद्री पर्वताच्या रांगांमध्ये बुद्धाच्या कलाकृती असलेल्या गुंफा दिसतात.)



जैन विठ्ठलाला तो बाविसावा तीर्थंकर नेमीनाथ आहे, असे मानतात. नेमीनाथ आणि कृष्ण हे दोघेही गोपाळच होते. ते यदुकुलोत्पन्नच होते. नेमीनाथ हाही विठ्ठलासारखा वर्णाने सावळा होता. नेमीनाथांचे शंख हे चिन्ह विठ्ठलानेही धारण केले आहे. त्यामुळे या सर्व लक्षणांवरून विठ्ठल हा दिगंबर नेमीनाथ असावा, असे जैनांचे मत आहे.

दक्षिणेला हाच गोपाल श्रीव्यंकटेश ऊर्फ तिरुपती बालाजी म्हणून प्रसिद्ध आहे; कारण व्यंकटेशाची पत्नी पद्मावती आहे, तर विठ्ठलाच्या पत्नीचेही नाव पद्मावती (पदुबाई) आहे. व्यंकटेशाची पत्नी पद्मावती त्याच्यावर रुसून तिरूयानूर येथे चिंचेच्या वनात रहायला गेली, तर विठ्ठलाची पत्नी रुक्मिणी ही दिंडीर वनात (चिंचेच्या वनात) जाऊन बसली होती.

विठ्ठलाला पांडुरंग म्हणतात, तसेच व्यंकटेशालाही कर्नाटकातील पर्वताच्या स्थलनामावरून वेंगडम् असे म्हणतात. त्यामुळेच त्याला विठ्ठलेश्वर अथवा व्यंकटेश असेही म्हणतात. कुरूबा (कुरूबा समाज हा धनगर पोटजातीपैकी एक आहे.) आणि धनगर यांचा देव एकरूप होऊन त्यातून विठोबा निर्माण झाला.

शिला प्रतिमेतून ही जी सांगोपांग मूर्ती घडली, ती मात्र या दोन्ही जमातींनी शतकानुशतके त्याच रूपात जपून ठेवली असली पाहिजे; म्हणूनच विठ्ठल आणि तिरुपति या दोन्ही मूर्तींत पुष्कळ साम्य आढळते. पंढरीचा विठोबा दोन्ही हात कटीवर ठेवून उभा आहे, तर कर्नाटकात तो एक हात कटीवर आणि दुसरा हात वरद मुद्रेत असलेला अशा स्वरूपात अनेक ठिकाणी पहायला मिळतो. त्यामुळेच संतांनी सावळा हो विठ्ठलु कर्नाटकु, असे त्याचे वर्णन केले आहे.

संतांनी त्याला कानडा म्हणूनही हाक मारली आहे. चैतन्याची ज्या अनुसंधानातून आराधना केली जाते, त्या स्वरूपात ते प्रगट होते. ज्याचा जसा भक्तीभाव असेल, तशी त्याला देव अनुभूती देतो.

बंगालमधील कोलकाता येथील कोळ्यांच्या राणीने दक्षिणेश्वरी देवीची स्थापना केली होती.

त्या देवळात तिने श्रीरामकृष्ण परमहंस यांची पुजारी म्हणून नियुक्ती केली होती. श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या भक्ती-भावामुळे देवी त्यांच्यावर प्रसन्न झाली आणि तिने त्यांना दर्शन दिले. अनेकांना वाटते, दगडात देव असतो का?; परंतु भक्ती-भावाने दगडालाही पाझर फुटतो, हे ध्यानात घ्यायला हवे.

पांडुरंग हे सामान्यांचे दैवत आहे. पांडुरंगाचा रंग सावळा आहे आणि कृष्णही सावळाच आहे. काळा रंग हा अद्वैताचा आहे. वृंदावनातील गोपी कृष्णाला म्हणत, अरे कृष्णा, तू अमावास्येला अंगावर काळी घोंगडी घेऊन यमुनाकाठी कदंब वृक्षावर बसलास की, तू आम्हाला दिसतच नाहीस; कारण रात्र काळी, यमुना काळी, तू काळा आणि घोंगडीही काळीच !

अशा वेळी हे सर्व अद्वैत होऊन जाते. संत ज्ञानदेव म्हणतात,

*तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे ।*
*सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।*

म्हणजेच तो सगुण आहे आणि निर्गुणही आहे. त्याचे सगुण स्वरूप हे निर्गुणच आहे. तो स्वच्छ म्हणजे निर्मळ आहे. त्याची इंद्रिये विकाररहित आणि स्वच्छ आहेत. तो आत-बाहेर स्वच्छ आहे; म्हणून तो ह्यपांडुरंगह्न आहे. एकदा लहानपणी संत ज्ञानेश्वर आणि मुक्ताबाई खेळत असतांना मुक्ताबाई ज्ञानदेवांना म्हणाली, अरे दादा, तू या पांडुरंगाला निर्गुण म्हणतोस; परंतु हा तर सगुण स्वरूपात येथे कटीवर हात ठेवून उभा आहे.

त्यावर संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, मुक्ता, मी तुला गुरुमुखातून सांगतो. अगं, हा निर्गुणी बुंद (बिंदु) सगुणी उतरला आहे. एकूणच हा निर्गुणच सगुण स्वरूपात इथे दिसत आहे. तो कष्टकरी, शेतकरी, सामान्यजन आणि अनाथ यांचा कैवारी आहे; म्हणून तो (उन्हात कष्ट करून रापलेला असा) काळ्या रंगाचा झाला आहे.

असा हा सगुण-निर्गुण रूपी पांडुरंग आहे. कोणत्या तरी विशिष्ट वारीला, तिथीला अथवा कोणत्या तरी मासात विशिष्ट देवतांची स्पंदने पृथ्वीवर अधिक प्रमाणात कार्यरत असतात. तो काळ त्या देवतेचा काळ मानला जातो, उदा. शिवाचा सोमवार, दत्ताचा गुरुवार, तशी श्रीविष्णूची एकादशी.

वर्षभरात २४ वेळा येणाऱ्या एकादशींच्या तुलनेत आषाढ आणि कार्तिक मासांतील शुक्लपक्षात येणाऱ्या एकादशींच्या वेळी श्रीविष्णूचे तत्त्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात येत असल्याने श्रीविष्णूशी संबंधित या दोन एकादशींचे महत्त्व अधिक आहे.

■ ■ ■

### विठुरायाच्या चरणी अंतर्मनाची वारी

**वाचक लिहितात**

आषाढी एकादशी म्हटली की, डोळ्यांसमोर येते ती पंढरपूरची वारी! वारकरी आपले तन, मन आणि धन सर्वकाही विठुरायाच्या चरणी अर्पण करून, पदोपदी भगवंताचे स्मरण करीत वारी करतात.

काशीच्या पाच यात्रा आणि द्वारकेला तीन वेळा जाणे , या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते, असे मानले जाते. त्यामुळे भक्तांच्या मनात वारी करून भक्तीच्या अथांग सागरात डुंबण्याची तीव्र इच्छा निर्माण होते.

मात्र, बरेचदा वैयक्तिक अडचणींमुळे किंवा इतर कारणांमुळे प्रत्यक्ष वारी करणे शक्य होत नाही. अशावेळी अंतर्मनाची वारीȤ, म्हणजेच आपले मन, श्रद्धा आणि साधनेच्या माध्यमातून मानस रूपाने वारी करणे सहज शक्य आहे.

ज्याप्रमाणे वारीत शेकडो किलोमीटरचा प्रवास करताना वारकरी नामस्मरण करतात, त्याचप्रमाणे आपणही घरी राहून, चालताना, काम करताना भगवंताचा नामजप करू शकतो. वारीतील शिस्त जसे की, सकाळी लवकर उठणे, स्नान करून ध्यान-पूजा करणे, अनावश्यक बोलणे टाळणे, यांचे पालन घरी राहून शक्य आहे.

वारीतील महत्त्वाचा भाग म्हणजे सेवा! आजारी व्यक्तीची सेवा करणे, वृद्धांना मदत करणे, आई-वडिलांची सेवा करणे ही तर मानस वारीतील सेवा-दिंडीच आहे!

अशाप्रकारे, मानस वारीचा अनुभव घेत, विठुरायाच्या चरणी आर्ततेने प्रार्थना करू या, हे विठुराया, तू भक्तीचा भुकेला आहेस. तुज्या चरणांशी येण्यासाठी तुझी भक्ती तळमळीने कशी करायची, हे तूच आम्हाला शिकव आणि त्यासाठी तूच आम्हाला भक्ती आणि शक्ती दे!

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

# मुलांना केचपसोबत चपाती-पराठा देता का?

### नुकसान लक्षात घ्या



आजच्या काळात मुलांच्या खाण्याच्या सवयी खूप बदलल्या आहेत. धावपळीचे जीवन, काम करणाऱ्या पालकांचे व्यस्त वेळापत्रक आणि बाजारात उपलब्ध असलेल्या रेडी-टू-ईट अन्न पर्यायांमुळे, कधीकधी मुलांना त्यांना आवडणारे अन्न सहज देणे सोपे वाटते. पोळीसोबत केचप देणे हा देखील या पर्यायांपैकी एक बनला आहे. मुलांना केचपची गोड आणि आंबट चव इतकी आवडते की त्यांना ते सर्व गोष्टींसोबत खायला आवडते.

बऱ्याचदा आई लंच बॉक्समध्ये मुलांसाठी केचपसह रोटी, पराठा किंवा सँडविच पॅक करतात. तर दररोज केचप खाणे मुलांच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. मुलांना चपाती किंवा पराठासोबत केचप का देणे टाळावे ते जाणून घेऊया.

केचपमध्ये भरपूरप्रमाणात साखर असते टोमॅटो केचपची चव सुधारण्यासाठी त्यात भरपूर प्रमाणात रिफाइंड साखर टाकली जाते.

एक चमचा केचपमध्ये सुमारे एक चमचा साखर असते, जी मुलांच्या वयासाठी खूप जास्त घातक असते.

त्यामुळे, नियमितपणे जास्त केचप खाल्ल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा, मधुमेह तसेच दातांच्या समस्या उद्भवू शकतात. याशिवाय, जास्त साखर खाल्ल्याने मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव निर्माण होतो आणि ते स्वभावाने चिडचिडे देखील होऊ शकतात.

मीठ आणि प्रिझर्वेटिव्ह्ज देखील हानिकारक आहेत. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की केचपमध्ये सोडियमचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे मुलांच्या रक्तदाबावर परिणाम होऊ शकतो आणि हृदयाच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो.

याशिवाय केचपमध्ये असलेले प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि कृत्रिम रंग पोटाच्या पचन प्रक्रियेवर वाईट परिणाम करतात. काही संशोधनांनुसार, प्रिझर्व्हेटिव्ह्जमुळे मुलांमध्ये ॲलर्जी, त्वचेच्या समस्या आणि चयापचय संबंधित समस्या उद्भवू शकतात.

जेव्हा मुलांना वारंवार केचअप दिले जाते तेव्हा त्यांच्या जिभेला या चवीची सवय होते. परिणामी ते इतर भाज्या आणि निरोगी अन्न पयार्यांपासून अंतर ठेवू लागतात. हळूहळू, या सवयीमुळे मुले घरी बनवलेले निरोगी अन्न पाहून तोंड फिरवू लागतात. मुलांच्या या सवयीचा थेट परिणाम त्यांच्या रोगप्रतिकारक शक्तीवर आणि मानसिक वाढीवर होतो.

**चांगले पर्याय कोणते?**
मुलांच्या आरोग्याचा विचार करता, त्यांना नैसर्गिक, पौष्टिक आणि ताजे अन्न देणे महत्वाचे आहे. जर मुलांना टोमॅटोची चव आवडत असेल तर घरी नैसर्गिक टोमॅटोची चटणी बनवा. यासोबतच त्यांना फळे, हिरव्या भाज्या आणि घरगुती निरोगी अन्न खाण्याची सवय लावा. केचपपासून मुलांना दूर ठेवण्याचा प्रयत्न करा.

■ ■ ■

### अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### दखल

दगडालाही
देवपण येण्यासाठी
सोसावे लागती घाव
तसचं स्वतःचं वलय
निर्माण करण्यासाठी
झिझावं लागतं राव ..!

कळपात चालणा?या
मेंढ्यांचे कुणालाच
वाटत नाही नवल
पण हटके पाऊलवाट
निर्माण करणा?यांची
दुनिया घेतेच ना दखल ..!

उच्चधेय्य
अथक परिश्रमानेच
होत असते स्वप्नपुर्ती
याची अनंत उदाहरणे
आहेत भुवरती ..!

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या हैदराबादमधील एकात्मिक उत्पादन सुविधेचे उद्घाटन

■ मुंबई,दि. ०५ जुलै :
जगभरात १३ देशांमध्ये ४०० हून अधिक विक्री दालनांसह जागतिक स्तरावरील पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठे दागिने विक्रेते असलेल्या, मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने तेलंगणातील हैदराबाद येथे त्यांची अत्याधुनिक, पूर्णपणे एकात्मिक अशी या प्रकारातील सर्वात मोठी दागिने उत्पादन सुविधा सुरू केली आहे. रंगा रेड्डी जिल्ह्यातील महेश्वरम येथील जनरल पार्क येथे स्थित आणि ३.४५ लाख चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे अशा प्रकारचे पहिले एकात्मिक उत्पादन केंद्र आहे, जे भारत आणि आखाती देशांमध्ये समूहाच्या कार्यरत असलेल्या १४ उत्पादन सुविधांमध्ये सर्वात मोठे देखील आहे.



या एकात्मिक उत्पादन सुविधेमुळे आभूषण रचना, सोने शुद्धीकरण, दागिने निर्मिती, गुणवत्ता हमी, हॉलमार्किंग, वेअरहाऊसिंग आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन यासारखी सर्व महत्त्वाची कार्य एकाच छताखाली आणली गेली आहेत. या केंद्राची वार्षिक उत्पादन क्षमता ४.७टनांहून अधिक सोन्याचे दागिने आणि १.८ लाख कॅरेट हिऱ्यांचे दागिने निर्मितीची आहे, तसेच वार्षिक सोन्याची शुद्धीकरण क्षमता ७८ टन आहे. १८ राज्यांमधून २,७५० हून अधिक कुशल कारागिरांना रोजगार संधी या केंद्राने दिल्या असून, कर्मचाऱ्यांची सुरक्षितता, कल्याण आणि सोयही सुनिश्चित केली आहे. या सुविधेमधील ४० टक्के कर्मचारी हे स्थानिक परिसरांतून भरती केले गेले आहेत आणि एकूण पुरुष-महिलागुणोत्तर ८० मागे २० असे राखले गेले आहे.

तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री रेवंत रेड्डी यांनी या नवीन जनरल पार्क सुविधेचे अधिकृत उद्घाटन मलाबार समूहाचे अध्यक्ष श्री एम.पी. अहमद; उपाध्यक्ष श्री अब्दुल सलाम के.पी; मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक श्री आशर ओ; कार्यकारी संचालक श्री निषाद ए.के. यांच्या उपस्थितीत मलाबार समूहाचे इतर वरिष्ठ व्यवस्थापकीय संघातील सदस्य, तेलंगणा सरकारमधील मान्यवर आणि हितचिंतक यांच्या उपस्थितीत केले.

वाढीव उत्पादन क्षमतांमुळे 'मेक इन इंडिया, मार्केट टू द वर्ल्ड' या दृष्टिकोनानुसार भारत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत समूहाच्या आक्रमक किरकोळ विक्री विस्तारालाही यातून चालना मिळेल. मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची सोने आणि हिऱ्यांच्या दागिन्यांची एकूण वार्षिक उत्पादन क्षमता अनुक्रमे ४०.६८ टन आणि ३.६१ लाख कॅरेटपेक्षा जास्त आहे. ज्यामुळे ती जगातील सर्वात मोठ्या दागिन्यांच्या निर्मात्यांपैकी एक बनली आहे.

या सुविधेच्या शुभारंभाबद्दल भाष्य करताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष श्री. एम. पी. अहमद म्हणाले, परंपरा, कला, आधुनिकता आणि अचूकता यांचे मिश्रण असलेले हैदराबादमधील आमचे अत्याधुनिक एकात्मिक दागिने उत्पादन केंद्र हे दागिन्यांच्या उत्पादनात एक नवीन युग सुरू करत आहे. आमच्या 'मेक इन इंडिया, मार्केट टू द वर्ल्ड' या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने, ही सुविधा जागतिक बाजारपेठेसाठी भारतात जागतिक दर्जाचे दागिने तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते. भारताला उत्कृष्ट कारागिरी आणि डिझाइन उत्कृष्टतेसाठी जागतिक केंद्र म्हणून स्थान देण्याच्या दिशेने ही सुविधा एक धोरणात्मक झेप दर्शवते. प्रेमाचे शुद्ध प्रतीक म्हणून सोने, प्रेम आणि स्नेहाची अभिव्यक्ती म्हणून वारसा हा कालातीत राहील. मलाबार गोल्ड अँड डायमंड्समध्ये, आम्ही आमच्या विश्वासार्ह आजीवन देखभालाची हमी आणि पारदर्शक बायबॅक गॅरंटीच्या 'मलबार प्रॉमिसेस'द्वारे समर्थित, केवळ सर्वोत्तम सोने आणि हिऱ्याचे दागिने देऊन या वारशाचा सन्मान करतो -प्रत्येक खरेदीमध्ये आम्ही आणत असलेल्या शाश्वत मूल्य आणि अखंडता हा त्याचाच पुरावा आहे.

# स्कोडा ऑटो इंडियाने आतापर्यंतचा सर्वोच्च सहामाही विक्रीचा टप्पा गाठला

■ नागपूर,दि. ०५ जुलै :
स्कोडा ऑटो इंडिया प्रगतीच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करत आहे, जेथे भारतात २५ वा वर्धापन दिन आणि जागतिक स्तरावर १३० वे वर्ष साजरा करत आहे. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटोने भारतातील आपल्या २५ वर्षांच्या इतिहासामध्ये सर्वोच्च सहामाही विक्री संपादित केली आहे.




स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, ''आमच्या महत्त्वपूर्ण सहामाही विक्रीमधून भारतातील ग्राहकांनी स्कोडा उत्पादने व सर्विसेसचा केलेला अवलंब दिसून येतो. आमच्या ग्राहकांना दररोज विश्वातील सर्वोत्तम स्थळांना एक्स्प्लोअर करायला आवडते. आमच्या पोर्टफोलिओमध्ये कायलॅकची भर करण्यासह आम्ही आता 'एसयूव्ही फॉर एव्हरीवन'च्या माध्यमातून, तसेच आमच्या सेदान ऑफरिंगच्या माध्यमातून त्यांचा प्रवास अधिक सुखकर व उत्साहवर्धक करत आहोत.

२०२५ च्या पहिल्या सहामाहीत ३६,१९४ हून अधिक युनिट्सच्या विक्रीसह स्कोडा ऑटो इंडिया आता भारतातील टॉप सात ऑटोमोटिव्ह ब्रँड्समध्ये सामील झाली आहे. २०२४ मधील रँकिंगच्या तुलनेत कंपनीने चार पोझिशन्स वर झेप घेतली आहे. तसेच, स्कोडा ऑटो इंडियाने २०२२ मधील २८,८९९ युनिट्सच्या सर्वोत्तम सहामाही विक्रीला मागे टाकले आहे.

२०२१ मध्ये १२० टचपॉइण्ट्स वरून स्कोडा ऑटो इंडियाने आपले नेटवर्क आजच्या तारखेपर्यंत २९५ हून अधिक टचपॉइण्ट्सपर्यंत विस्तारित केले आहे. कंपनी २०२५ च्या अखेरपर्यंत ३५० टचपॉइण्ट्सचा टप्पा गाठण्याच्या आपल्या ध्येयाप्रती कटिबद्ध आहे, ज्यासाठी भारतभरात विनासायास ग्राहक अनुभव देण्याप्रती कटिबद्धता अधिक दृढ करत आहे.

# शाहरुख खान यांच्या हस्ते सिटी ऑफ ड्रिम्स श्रीलंकाचे भव्य उद्घाटन

■ मुंबई,दि. ०५ जुलै :
दक्षिण आशिया, सज्ज व्हा! बॉलिवुडचा वादातीत बाहशहा शाहरुख खान श्रीलंकेला एका अप्रतिम सोहळ्यासाठी भेट देण्यास सज्ज झाला आहे. २ ऑगस्ट २०२५ रोजी सिटी ऑफ ड्रिम्स श्रीलंकाचा भव्य उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती दर्शवली.

किंग खान अशी ओळख असलेल्या, अनेक पुरस्कारांनी सन्मानित या सुपरस्टारची निमंत्रितांसाठी असलेल्या या भव्य उद्घाटन सोहळ्यातील उपस्थिती म्हणजे दक्षिण आशियातील या पहिल्या लक्झ्युरी समावेशक रिसॉर्टचे महत्त्व ठळकपणे दाखवून देणारी कृती होती. जॉन केल्स होल्डिंग्स आणि मेल्को रिसॉर्ट्स अँण्ड एंटरटेनमेंटच्या लक्षणीय भागीदारीतून हे रिसॉर्ट विकसित करण्यात आले आहे.



सिटी ऑफ ड्रिम्स श्रीलंकाचा भव्य उद्घाटन सोहळा २०२५ मधील या भागातील सर्वात ग्लॅमरस सोहळा म्हणून ओळखला जाईल. यावेळी रिसॉर्टच्या लेट्स गो, लेट गो या मोहिमेचाही अधिकृतरित्या शुभारंभ करण्यात आला. यातून लक्झ्युरी आणि मनोरंजनाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. त्याचप्रमाणे बहुविध खाद्यानुभव, सौंदर्यपूर्ण हॉटेल रूम्स, तुम्हाला ताजेतवाने करणारे वेलनेस रीट्रिट्स, लक्झ्युरी रिटेल अनुभव आणि देशातील सर्वात मोठी आणि सर्वाधिक सौंदर्यपूर्ण मिटिंग आणि इव्हेंटसाठीची जागा अशा विविध प्रकारच्या आकर्षक सोयीही उपलब्ध झाल्या आहेत.

या एकात्मिक रिसॉर्टमध्ये जागतिक दर्जाचा, मेल्को रिसॉर्ट्स अँण्ड एंटरटेनमेंटतर्फे संचालित कॅसिनोही आहे. मेल्कोचा लक्झ्युरी हॉटेल ब्रँड नुवा इथे सुरू झाल्याने कोलंबोमधील उत्कृष्ट आदरातिथ्य सेवांमध्ये मोलाची भर पडली आहे.

कॅलेंडरमध्ये तारीख नोंदवून ठेवा २ ऑगस्ट २०२५ आता कोलंबो कायमचे बदलणार आहे.

# झी टीव्ही प्रस्तुत करत आहे तुम से तुम तक

## वय आणि वर्गभेदाच्या पलीकडील प्रेमकथा !

■ मुंबई,दि. ०५ जुलै :
भारतीय समाजात नातेसंबंध आणि विवाह हे अनेकदा जुन्या परंपरांवर आधारित असतात वय, आर्थिक स्थिती आणि सामाजिक पार्श्वभूमी यांना खूप महत्त्व दिले जाते. पण प्रेम कधीच ह्या नियमांना पाळत नाही ते स्वतःचा मार्ग शोधते आणि अनेकदा रूढी मोडून पुढे जाते. अशाच एक अनोख्या आणि आधुनिक प्रेमकथेवर आधारित झी टीव्ही घेऊन येत आहे एक नवीन मालिका तुम से तुम तक, जी प्रेमाच्या अशाच अनोख्या प्रवासाला सुंदर पद्धतीने सादर करते.



ही कथा आहे अनु आणि आर्यवर्धन यांच्या अनोख्या नात्याची अनु ही १९ वर्षांची मध्यमवर्गीय मुलगी आहे आणि आर्यवर्धन हा ४६ वर्षीय स्वतःच्या मेहनतीने पुढे आलेला एक व्यावसायिक आहे. वय, सामाजिक दर्जा आणि जीवनशैलीत प्रचंड फरक असतानाही त्यांच्या हृदयात प्रेमाचा अंकुर फुटतो, आणि समाजाच्या अपेक्षांना आव्हान देणारी एक नवी कहाणी सुरू होते. ही नवी मालिका झी टीव्हीच्या आपका अपना झी टीव्ही या ब्रँड विचारधारेअंतर्गत सादर होणाऱ्या महत्त्वाच्या कथा संकल्पनांपैकी एक आहे.

ती झी कन्नडवरील प्रचंड यशस्वी मालिका जोथे जोथियाली यावरून प्रेरित आहे. स्टुडिओ एलएसडी प्रा. लि. निर्मित तुम से तुम तक या मालिकेचा प्रीमियर ७ जुलैपासून होत असून दररोज संध्याकाळी ८:३० वाजता ही झी टीव्हीवर प्रसारित होईल.

# महिंद्रातर्फे बीई ६ आणि एक्सईवी ९ई पेक टू चे वितरण जुलैअखेरपासून सुरू

**७९ केडब्ल्यूएच आणि ७९ केडब्ल्यूएच असे दोन्ही पर्याय अनुक्रमे२१.९० लाख रूपये आणि २३.७० लाख रुपयांपासून सुरू**

■ मुंबई,दि. ०५ जुलै :
महिंद्राच्या इलेक्ट्रिक ओरिजन एसयूव्हींनी भारतीय ईव्ही बाजारपेठेत मूल्याच्या बाबतीत अग्रेसर स्थान मिळवले आहे. ग्राहकांचा विश्वास आणि त्यांनी दाखवलेल्या उत्साहामुळे देशभरात दर दहा मिनिटांना इलेक्ट्रिक एसयूव्हीची विक्री होते.



हा उत्साहवर्धक प्रतिसाद कायम ठेवत महिंद्रा त्यांच्या प्रसिद्ध बीई ६आणि एक्सईवी ९ई पेक टूचे वितरण जुलैअखेरपासून २१.९० लाख रुपयांना सुरू केले जाणार आहे. ग्राहकांनी दिलेला जोरदार प्रतिसाद लक्षात घेत महिंद्राद्वारे पॅक टु सध्या उपलब्ध असलेल्या ५९ केडब्ल्यूएच व्हेरिएंटबरोबरच ७९ केडब्ल्यूएच बॅटरी पर्यायात उपलब्ध केला जाणार आहे. या व्हेरिएंटद्वारे अनुक्रमे ५०० किमी आणि ४०० किमी रेंज शहरात मिळणार आहे.

दोन्ही बॅटरी पर्यायांमध्ये महिंद्राचे अत्याधुनिक तंत्रज्ञान, १६ स्पीकर हर्मन कार्डन साउंड सिस्टीम डॉल्बी अटमॉस, संपूर्ण काचेचे छत, २ लेवल अत्याधुनिक, ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टीम्स (लेल २ एडीएएस), एक्सईवी ९ई मध्ये ट्रिपल स्क्रीन वाइड सिनेमास्कोप, बीई ६मध्ये रेस रेडी डिजिटल कॉकपिट इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत. या सुविधांमध्ये नाविन्य, सुरक्षा व आधुनिक आलिशानता यांचा मेळ घालण्यात आला आहे. त्याशिवाय महिंद्रा बीई ६ पेक टू मध्ये पॅक थ्रीप्रमाणे प्रीमियम सेज लेदरचे इंटेरियर्स देत असून त्याला केबिनचा प्रशस्त व अभिजात स्वरूप उंचावण्यासाठी उच्चभ्रू आयव्हरी रूफ फिनिशची जोड देण्यात आली आहे.

प्रतीक्षेत असलेल्या सर्व ग्राहकांना त्यांचे बुकिंग नवीन पेक टू ७९ केडब्ल्यूएच व्हेरिएंटमध्ये अपग्रेड करण्याची संधी असून त्यातून महिंद्राची ग्राहकांच्या आवडीप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देण्याची बांधिलकी दिसून येते.

२१.९० लाख रुपयांपासून सुरू होणाऱ्या पॅक टु द्वारे महिंद्राचे प्रीमियम इलेक्ट्रिक वाहतुकीचे आश्वासन आणखी दृढ होत असून कंपनी डिझाइन व तंत्रज्ञानात आघाडीवर आहे. महिंद्राचे सर्व्हिस नेटवर्क भारतात ३०० ठिकाणी कार्यरत असून ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार कुठेही जाऊन मनासारखी सेवा मिळवता येईल.


॥ झाडु संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥

## पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर

**स्वच्छ भारत अभियान   स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)   स्वच्छ सर्वेक्षण 2025  व  माझी वसुंधरा 6.0**

### आषाढी यात्रा 2025
### यात्रेकरुंना व भाविकांना नम्र आवाहन
### माझ्या विठ्ठलाची पवित्र पंढरी
### स्वच्छ,सुंदर,हरित ठेवण्याची माझ्यासह प्रत्येकाची जबाबदारी

पंढरपूर हे भुवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरुंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.


1) यात्रेकरु,दिंडीकरी,फडकरी, भाविक भक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर 65 एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.
2) उघड्यावर शौचास बसु नये प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयाचा वापर करावा.
3) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.
4) **पत्रावळी व द्रोणचा वापर** :- जेवणाकरीता थर्माकोल,प्लॉस्टिकच्या पत्रावळी वापरू नये त्याएवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा,द्रोणचा वापर करावा व प्लॉस्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.
5) **कचरा व्यवस्थापन** :- आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ.तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकु नये.
6) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये, नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टॅकरचे पाणी प्यावे.
7) शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.
8) धोकादायक इमारतीमध्ये राहू नये.
9) **पार्कींग व्यवस्था ठिकाणे** :- भिमा बस स्टँड मोहोळ रोड , ६५ एकर मागील बाजु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल,अंबाबाई पटांगण, इसबावी विसावा पार्किंग, वेअर हाऊस पार्किंग, यमाई तुकाई पार्किंग, बिडारी बंगला पार्किंग, गजानन महाराज मठ क्र.१, एलआयसी ऑफीस पार्किंग, सुलभ शौचालय पार्किंग, गाडगेबाबा चौक, भक्त निवास, तुळशी वृंदावन शेजारी, ५२ एकर पार्किंग, वाखरी, खादी ग्रामोद्योग,६५ दिंडी परिसर वाहन,सखुबाई कन्या प्रशाला पार्किंग इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

(श्री.सचिन इथापे)
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

(श्री.महेश रोकडे)
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर


# शब्दकोडे क्रमांक २१५६



**आडवे शब्द :-**
१) फौजेबरोबर असणारी अवांतर माणसे
६) गदा घेतलेला
१०) हाक, प्रतिसाद
११) अन्यायाचे, बेकायदेशीर
१३) जास्त
१४) तृष्णा
१६) तेज, कांती
१८) नम्र, वाकलेला
२०) सामुद्रीवाहन
२३) टिकून राहाणे
२४) प्रस्थान करणे
२६) कडक
२७) दीन, दुबळ्यांवर दया करणारा
२९) थंडावा
३१) दाद
३३) चंद्र
३४) जास्तीचे, गणितातील मिळविणे
३६) माणूसकी
४१) प्रेत वाहून नेताना म्हणावयाचे शब्द
४४) हिंदुस्थान
४६) शिकारीचा प्राणी
४८) श्रीमंत
५०) प्रतिष्टा, अब्रू
५१) त्या प्रकारचा
५२) थरथरणे
५४) दृढ, पक्का, कायम
५६) धैर्य, हिंमत
५८) घाबरणे
६०) संगमरवरी दगड
६२) अंगठ्या जवळचे बोट
६४) सोवळ्यातील रेशमी वस्त्र
६५) गेरू
६६) वेल
६८) मऊ
७०) येथे जाणे म्हणजे नाश पावणे, बुडणे (वा.प्र.)
७३) चामखीळ
७४) सारखा
७६) गणक, मोजणारा
७७) शर्करा
७८) चणचण, दुर्भिक्ष
८०) बाज विणण्याची सुती पट्टी
८२) काठोकाठ
८४) फायदा, प्राप्ती
८५) दृष्टीभेट
८६) आणि

**उभे शब्द :-**
१) निराधार बातमी, अफवा
२) पृथ्वी
३) चर्मपात्र, कुपी
४) निवासस्थान
५) नाजूक
६) गणपती
७) मोठा भाऊ
८) पद्धत
९) जन्म मृत्यू
१२) राजाची मुलगी
१५) हस्त
१७) यज्ञ
१९) नटणारा
२१) सूची
२२) मूळ आधार
२५) हिमालय
२८) प्रिय स्त्री
३०) रक्कम, ठराविक पैसे
३२) एक ग्रामदेवता
३५) एक हजार गॅम
३७) दुष्ट
३८) वांती
३९) महान, मोठा
४०) सामान्य
४२) सिनेमा
४३) हिस्सा, वाटा
४४) अवधान, चित्त
४५) बारा वर्षाचा काळ
४७) वस्ती
४९) उपयोग
५०अ) बूड
५३) पाताळ, यमराज्य
५४) पोलीसचौकी
५५) रबरी चपला
५७) ऑपरेशन करणारा डॉक्टर (इं.)
५९) कदर करणारा
६०) त्रिफळातील आंबट फळ
६१) मनाला लागलेली टोच
६३) फोडणी दिलेले ताक
६६अ) दिवस
६७) आभाळ
६९) मला
७१) उंट हाकणारा
७२) संतोष, आनंद
७३) महिरप
७५) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
७७) आधारासह
७९) फक्त, केवळ
८१) पराग
८३) प्रतिदिनी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# दोन अड्डे; एकावर कारवाई, दुसऱ्याकडे दुर्लक्ष

## पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** – येथीलसंत गाडगेबाबा संकुलात अवैध चक्री जुगार सुरु होते, माहितीप्रमाणे हे दोन्ही अड्डे एका आमदाराच्या निकटवर्तीयांच्या मालकीचे होते, त्यातील एका अडड्यावर पोलीस कारवाई झाली. मात्र दुसऱ्याकडे पोलिसांनी डोळेझाक केल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे पोलीस विभागाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संत गाडगेबाबा संकुल येथे सुरू असलेल्या ऑनलाईन लॉटरी सेंटरच्या आड चालणाऱ्या चक्री जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखा युनिट क्रमांक दोनच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली.

4 जुलै रोजी दुपारी 3.15 वाजता ही कारवाई झाली. या वेळी पोलिसांनी टीव्ही, मोबाईल आणि ऑनलाईन जुगारासाठीचे साहित्य असा एकूण 48 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात पवन राजू कैथवास (24, महादेवखोरी) आणि अमन प्रदीप सोनोने (23, केवल कॉलनी) यांना रंगेहाथ अटक करण्यात आली. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या छाप्यात संजय वानखडे, महेंद्र येवतीकर, गजानन ढेवले, दीपक सुंदरकर यांसह अनेक पोलिसांचा सहभाग होता.



### निलेश भेंडेसह दोघे फरार

तर सेंटरचा मालक अरबाज जानीवाले (फ्रेजरपुरा) व नीलेश भेंडे (चैतन्य कॉलनी) हे दोघे फरार झाले. कारवाईदरम्यान मिळालेल्या माहितीवरून 'फन टारगेट' या वेबसाइटच्या माध्यमातून ऑनलाईन गेमवर पैशांची बाजी लावून जुगार खेळवला जात होता, असे समोर आले आहे. दोन दिवस उलटून गेल्यावर अजुनही दुसऱ्या जुगार अड्ड्यावर कारवाई झाली नाही. दुसऱ्या अड्ड्यावर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्यामुळे नागरिकांत नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेषत: दोन्ही अड्ड्यांचा संबंध एका आमदाराच्या निकटवर्तीयांशी असल्याची चर्चा सुरू असल्याने पोलिसांच्या कारवाईतील निवडकपणा स्पष्टपणे दिसून येतो.

# वडाळी गार्डन, छत्री तलावाच्या विकासाकरिता निधी आणणार

## महापालिका आयुक्त सौम्या शर्मा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** – अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा यांनी वडाळी गार्डन आणि छत्री तलाव परिसराची पाहणी करून संपूर्ण परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरण पूरक करण्यासाठी ठोस निर्देश दिले. शहरातील हिरवळीचे संवर्धन आणि निसर्गरम्य ठिकाणांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने वडाळी परिसर अत्यंत महत्त्वाचा केंद्रबिंदू ठरेल, असे आयुक्तांनी सांगितले. नागरिकांना आरोग्यदायी आणि आकर्षक सार्वजनिक जागा मिळावी, या उद्देशाने या परिसराचा विकास होणार आहे.

आयुक्तांनी तलावाचे पाणी स्वच्छ ठेवणे, प्लास्टिक व इतर कचऱ्यापासून मुक्त करणे, पादचारी मार्ग तयार करणे, सुरक्षिततेसाठी रेलिंग बसवणे आणि प्रकाशयोजनेत सुधारणा करण्यावर भर दिला. या दृष्टीने नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच योजनाबद्ध उपाययोजना राबवण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. या निरीक्षणावेळी नगर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, प्रकल्प अभियंता राजेश अगरकर, प्रकाश विभागाचे उपअभियंता शरद तिनखडे, अभियंता चिन्मय देशपांडे, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक कुंदन हडाले, स्वच्छता निरीक्षक आणि उद्यान विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. मनपाच्या या उपक्रमामुळे वडाळी परिसराची रूपरेषा बदलणार असून लवकरच नागरिकांना एक सुंदर, हिरवळयुक्त आणि आधुनिक सार्वजनिक जागा अनुभवायला मिळणार आहे.



### वडाळी गार्डनसाठी विशेष आधुनिक योजना

मनपातर्फे तयार करण्यात आलेल्या आधुनिक बागेच्या योजनेमध्ये ओपन जिम आणि योग मंच, स्वच्छ व सुलभ शौचालय, आकर्षक प्रवेशद्वार व माहिती फलक, नव्या फुलझाडांची व सावली देणाऱ्या झाडांची लागवड, लहान मुलांसाठी खेळाची साधने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विश्रांती व्यवस्था आदींचा समावेश आहे.

### सनिधीसाठी सरकारकडे प्रस्ताव

या आधुनिक उद्यान प्रकल्पासाठी आवश्यक निधीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. निधी मंजूर झाल्यानंतर कामांना गती दिली जाईल, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला. वडाळी गार्डनची हरियाली शहराच्या सौंदर्यात भर घालेल आणि हे नागरिकांसाठी एक प्रतिष्ठित हरित क्षेत्र ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले. विकास प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग अत्यंत आवश्यक असल्याचेही आयुक्त सौम्या शर्मा यांनी नमूद केले. शहरातील प्रत्येक सार्वजनिक जागा ही नागरिकांची आहे आणि मनपा त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता व आनंदासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे, असे त्या म्हणाल्या.

# तिवसा तालुक्यातील 45 ग्रामपंचायतीं आरक्षण सोडत 8 ला

## महिला सरपंच पद आरक्षण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.5 )** – तिवासा तालुक्यातील एकूण 45 ग्रामपंचायतींमध्ये आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी 'सरपंच' पद हे महिलांसाठी आरक्षित करण्यात आले आहे.

ग्रामपंचायत अधिनियम आणि शासनाच्या अधिसूचनेनुसार, 13 जून 2025 पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी ग्राम पंचायतींमध्ये सरपंच पद (महिलांसाठी) आरक्षित ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. या आरक्षण निश्चितीसाठी, मंगळवार, दि. 8 जुलै 2025 रोजी दुपारी 12 वाजता तिवासा येथील तहसीलदार सभागृहात सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नामाप्र प्रवर्गातील महिला आरक्षणासह सरपंच पदांसाठी जागा जाहीर केल्या जातील. यावेळी सर्व ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तिवसा तहसीलदार डॉ. मंजूर कळसे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## देवस्थानातील चोरी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.5 )**– विदर्भाची काशी म्हणून ओळखले जाणारे पवित्र वाठोडा येथील शुक्लेश्वर देवस्थान मंदिरात 28 जूनच्या रात्री चोरीची घटना घडली असून, 29 जूनच्या सकाळी ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

या संदर्भात महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. आज महासंघाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या निवेदनात, चोरीचा तपास तातडीने पूर्ण करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, मंदिर ही भाविकांची श्रद्धास्थाने असून त्याठिकाणी वारंवार होणाऱ्या चोऱ्यांमुळे जनतेत अस्वस्थता व संताप पसरत आहे. त्यामुळे मंदिर परिसरात योग्य ती सुरक्षा यंत्रणा उभारावी व पोलीस प्रशासनाने या घटनांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली. निवेदन प्रसंगी श्रीनिवास पांडुरंग खेरडे, रामदास सदाशिवराव बुरघाटे, उमेश पंजाबराव गावंडे, प्रदीप लक्ष्मणराव ठोसर (सर्व वाठोडा शुक्लेश्वर रहिवासी), आशिष मारुडकर (सचिव, श्री पिंगळादेवी देवस्थान), कैलास पनपालिया (जिल्हा समन्वयक, महाराष्ट्र मंदिर महासंघ), मोहन इंगळे (विश्वस्त, श्री नागेश्वर महादेव संस्थान, धामंत्री), पुंजाराम नेमाडे (अध्यक्ष, श्री विठोबा संस्थान, सावंगा वि.), सचिन वैद्य, प्रदीप गर्गे, श्रीकांत पिसोळकर, निलेश टवलारे (सर्व हिंदू जनजागृती समितीचे पदाधिकारी) उपस्थित होते. बैठकीत सर्व उपस्थितांनी एकमुखाने मंदिर सुरक्षेसाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी केली.



# शेतकऱ्यांनी पैसे भरूनही वंचित, कृषी वीज कनेक्शन तत्काळ द्यावे

## बबलू पावडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड,( दि.5 )** – वरूड-मोर्शी मतदारसंघातील 1,700 शेतकऱ्यांनी कृषी वीज कनेक्शनसाठी पैसे भरूनही अजूनपर्यंत विद्युत जोडणी न मिळाल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांनी मुख्यमंत्री व राज्याचे ऊर्जामंत्री यांच्याकडे निवेदन देत त्वरित पारंपरिक कृषी वीज कनेक्शन देण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांनी 2022, 2023 आणि 2024 या तीन वर्षांच्या कालावधीत वीज वितरण कंपनीने पाठविलेल्या डिमांड नोटीनुसार आवश्यक रक्कम भरली आहे. तरीही अद्याप त्यांना वीज कनेक्शन मिळालेले नाही. वीज जोडणी मिळेल या आशेवर अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात संत्रा, मोसंबी यांसारख्या पिकांची लागवड देखील केली आहे. मात्र आता वीज वितरण कंपनीकडून फोन व पत्राद्वारे सांगण्यात येत आहे की शासनाच्या नव्या धोरणानुसार पारंपरिक वीज कनेक्शन दिले जाणार नाही, व पैसे परत घेऊन जावे लागेल.

कंपनीकडून शेतकऱ्यांना सौर ऊर्जेच्या पर्यायाची ऑफर दिली जात आहे. मात्र शेतकऱ्यांनी याला स्पष्ट विरोध दर्शवला आहे. याचे कारण म्हणजे सौर ऊर्जेचे कनेक्शन केवळ 3 एचपी पर्यंत उपलब्ध आहे, तर वरूड तालुका ड्रायझोन असल्यामुळे येथे भूगर्भातील पाण्याची पातळी खूप खोल आहे. त्यामुळे 5 एचपी क्षमतेच्या पंपाची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत सौर ऊर्जेवर आधारित पंप चालणार नाहीत आणि शेतकऱ्यांचा मोठा आर्थिक तोटा होणार आहे.



### अन्यथा रस्त्यावर उतरतील

पावडे यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी पारंपरिक कनेक्शनसाठी अधिकृतरीत्या पैसे भरले आहेत, डिमांड मंजूर झाली आहे, अशा वेळी कनेक्शन न देणे हा सरळ अन्याय आहे. शासनाने सौर ऊर्जेचे कनेक्शन सक्तीने लादू नये. तसेच, डिमांडनुसार तत्काळ पारंपरिक वीज कनेक्शन देण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या निवेदनात स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, जर मागणी मान्य झाली नाही, तर शेतकरी आपले न्यायहक्क मिळवण्यासाठी रस्त्यावर उतरतील. त्यामुळे शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेणे अत्यावश्यक झाले आहे.

# पावसाळ्यात वाढणाऱ्या बेकायदेशीर वन्यजीव शिकारीला आळा घाला!

## विशेष भरारी पथक स्थापनेची मागणी-'वार' संस्था

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.5 )** –भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 च्या अनुसूची-1 मध्ये समाविष्ट असलेल्या काळवीट, हरीण, घोरपड व मोर यांसारख्या दुर्मिळ प्राण्यांच्या शिकारीत पावसाळ्याच्या सुरुवातीला वाढ होत असून, या बेकायदेशीर शिकारी आणि मांस विक्रीला आळा घालण्यासाठी %वाईल्ड लाईफ अवेअरनेस, रिसर्च ॲण्ड रेस्क्यू वेल्फेअर सोसायटी (वार)% या संस्थेने मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांना निवेदन सादर केले आहे. घोरपड मांस खाल्ल्याने शरीर बलवान होते या अंधश्रद्धेचा प्रभाव अजूनही ग्रामीण भागात कायम असून, आषाढी एकादशीच्या सणानिमित्त अशा शिकारीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. दर्यापूर व कुऱ्हा ही ठिकाणे घोरपड मांस विक्रीची प्रमुख केंद्रे बनली आहेत. यामुळे वन्यजीव तस्करीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. वार चे अध्यक्ष निलेश कंचनपूरे यांनी सांगितले की, अशा घटनांना आळा घालण्यासाठी विशेष भरारी पथके तयार करून संवेदनशील भागांमध्ये गस्त वाढवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्वयंसेवी संस्था आणि वनविभाग यांचा समन्वय साधल्यास कारवाई अधिक प्रभावी होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर %वार% संस्थेने मुख्य वनसंरक्षक आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प संचालक यांच्यासह मुख्यमंत्री तथा वनमंत्री एकनाथ शिंदे यांना सुद्धा निवेदन पाठवले आहे. या संवेदनशील विषयाची तातडीने दखल घेऊन आवश्यक ती यंत्रणा उभी करण्याची मागणी केली जात आहे. पावसाळा हा वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील काळ असल्याने, वेळेवर उपाययोजना न झाल्यास अनेक दुर्मिळ वन्यजीवांच्या अस्तित्वावर गंडांतर येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# तिवसात ज्वारी खरेदीचा गोंधळ, 744 शेतकरी प्रतीक्षेत

## राष्ट्रवादीची तहसीलदारांकडे धाव

**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा,( दि.5 )** – डॉ. पंजाबराव देशमुख खरेदी-विक्री सहकारी समिती अंतर्गत नाफेडच्या माध्यमातून सुरू झालेली ज्वारी खरेदी अचानकपणे थांबवण्यात आल्यामुळे तिवसा तालुक्यातील शेतकरी अडचणीत सापडले आहेत. यामुळे 744 शेतकरी आपल्या ज्वारीसह केंद्रावर प्रतीक्षेत आहेत.

या योजनेंतर्गत 884 शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. मात्र आजपर्यंत फक्त 140 शेतकऱ्यांचीच ज्वारी खरेदी झाली. उर्वरित शेतकऱ्यांना खरेदी केंद्रावर 'गोडाऊनमध्ये जागा नाही' असे कारण देऊन परत पाठवले जात आहे. ही अनागोंदी लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तर्फे तहसीलदार डॉ. मयुर कळसे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात खरेदीची अंतिम मुदत वाढवावी, नोंदणीकृत शेतकऱ्यांची तात्काळ ज्वारी खरेदी करावी आणि गोडाऊनच्या जागेचा प्रश्न तत्काळ सोडवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मंगेश बोबडे, शहर प्रमुख अजय सूरटकार, उपाध्यक्ष मंगेश पोल्हाड, कोषाध्यक्ष पुरुषोत्तम दाते, सतिश वानखडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.



# महागाईचा तडाखा : आषाढी एकादशीच्या खरेदीवर परिणाम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.5 )** – रविवार, 6 जुलै रोजी आषाढी एकादशीचा पवित्र सण मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे. जिल्ह्यातील विठ्ठल मंदिरांमध्ये सजावट, अभिषेक, आरती आणि कीर्तन भजनाचे आयोजन करण्यात येत असून, भाविकांनी तयारी सुरू केली आहे. घराघरात उपवासासाठी नियोजन करण्यात आले आहे. विशेषत: महिलांनी खरेदीसाठी बाजारात गर्दी केली असून, उपवासाच्या पदार्थांवरील मागणी झपाट्याने वाढली आहे.

मात्र, यंदाच्या आषाढी एकादशीला महागाईने उपवास करणाऱ्यांच्या खिशाला चाट दिला आहे. साबुदाणा, भगर, भूईमूंग, बटाटे, हरभरा डाळ, हिंग, जिरे, हिरव्या मिरच्या यांसारख्या उपवासासाठी अत्यावश्यक वस्तूंच्या किंमतीत गेल्या आठवड्याभरात लक्षणीय वाढ झाली आहे. या दरवाढीमुळे सर्वसामान्य उपवासधारकांमध्ये नाराजी आहे. आधीच महागाईचा भार असह्य झाला असताना, धार्मिक सणाच्या पार्श्वभूमीवर गरजेच्या वस्तू महाग होणे म्हणजे भाविकांच्या श्रद्धेचा अपमान असल्याचे नागरिक सांगत आहेत. महागाईच्या या प्रचंड लाटेवर नियंत्रण आणण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. बाजारात दर ठरवण्यासाठी नियंत्रण समित्या सक्रीय कराव्यात, कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी आणि गरजूंसाठी सवलतीचे दर असलेली उपवास साहित्याची दुकाने सुरू करावी, अशी सूचना समाज कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.



### शेंगदाणे गेले गगणात

भुईमूंग ही उपवासातील महत्त्वाची वस्तू असून, त्याची किंमत गगनात गेली आहे. एक आठवड्यापूर्वी 90 रुपये किलो दराने विकली जाणारी भुईमूग आता थेट 140 ते 150 रुपये किलो दराने विकली जात आहे. भगर देखील महागले असून, त्याचा दर 100-110 रुपयांवरून 125-130 रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. बटाटे, जे उपवासाचे प्रमुख घटक आहेत, त्यांचे दर 20 रुपयांवरून थेट 30 रुपये किलो झाले आहेत. हिरव्या मिरच्या देखील 70-80 रुपयांवरून 120 रुपये किलो झाल्याने तिखटखवय्यांना धक्का बसला आहे. या शिवाय हिंग, जिरे, हरभरा डाळ यांच्याही दरांमध्ये वाढ झाल्याने सामान्य जनतेला उपवासासाठी खरेदी करताना दुबार विचार करावा लागत आहे.

### फराळ्याची खिचडी, थालीपीठ आणि लाडू

उपवासाच्या निमित्ताने घराघरात साबुदाण्याची खिचडी, उपवासाचे थालीपीठ, फराळाचे लाडू अशा खास पारंपरिक पदार्थांची चव चाखण्याची उत्सुकता असते. मात्र यंदा ही उत्सुकता महागाईने काहीशी फिकी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.श्रद्धा आणि भक्तीला महागाईने लगाम लावू नये, हेच जनतेचे अपेक्षित सूत्र आहे. अशा पार्श्वभूमीवर आषाढी एकादशी सण साजरा करताना प्रशासनाने नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन यथोचित मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# लक्ष्मण हाके यांच्या विधानाचा राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीर निषेध

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.5 )**–लक्ष्मण हाके यांच्या आक्षेपार्ह विधानाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती जिल्हा ग्रामीणच्या वतीने शनिवारी इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील परिसरात जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी लक्ष्मण हाके यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून त्यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यात आला.यावेळी जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, विदर्भ युवा कॉंग्रेस अध्यक्ष निखील ठाकरे, महिला आघाडीच्या शोभना देशमुख, सारिका बोरकर, अनिता गावंडे, युवा आघाडीचे अंकुश घारड आणि अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निदर्शनामध्ये महिला, युवक व विविध सेलमधील कार्यकर्त्यांनी हातात निषेधाचे फलक घेत सहभागी होऊन आवाज उठवला.

# आज आषाढी एकादशीनिमित्य घुईखेडमध्ये दर्शनासाठी येणार हजारो भाविक

## घुईखेडमध्ये अवतरणार प्रति पंढरपुर

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,( दि.5 )** – विदर्भ प्रांतातील एकमेव असलेली श्री. संत बेंडोजी महाराज संजीवण समाधी, श्री क्षेत्र घुईखेड येथे आज रविवारी आषाढी एकादशीनिमित्य हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करणार असुन घुईखेडमध्ये प्रति पंढरपूर अवतरल्याचे चित्र पहावयास मिळणार आहे.

आषाढी एकादशी ही एका प्रकारची तालुक्यातील भाविक भक्तांकरीता अलौकीकच ठरत आहे. घुईखेड येथे आज बेंडोजी महाराजांची मिरवणुक काढण्यात येणार असुन दर्शनासाठी हजारो भाविकभक्त येणार आहे. हा क्षण पाहण्यासाठी व दैवतांचे दर्शन घेण्यासाठी गावातील प्रथेनुसार विशेषत- नवविवाहीत मुली तसेच बाहेरगावी कामानिमित्य राहणारे घुईखेडवासी या दिवशी गावात परत येतात. श्री संत बेंडोजी महाराजांची पालखी आज एकादशीच्या दिवशी सायंकाळी 5 वाजता मंदिराच्या बाहेर प्रवेश करून नागपुर- औरंगाबाद एक्सप्रेस हायवेवरून जाऊन चंद्रभागा नदीच्या पात्रामध्ये परंपरेनुसार आरती करण्यात येणार आहे. यानंतर मंदिरात आरती होऊन सोहळ्याची समाप्ती सायंकाळी होणार आहे. या मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री बेंडोजी बाबा संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, विश्वस्त प्रविण घुईखेडकर, विश्वस्त राजाभाऊ चौधरी व इतरांनी केले आहे.



# भक्तिमार्ग

## पुंडलिकें प्रकट केलें असे

अवीट अमोला घेता पैं निमोला। तो प्रत्यक्ष देखिला भीमातटीं।।
अव्यक्त साकार अकारिला अंकूर। क्षरला चराचर भक्तिकाजे।।
अनुमान विटे सर्वाघार्टीमाजिटें। तें परब्रह्म ईटें भक्तिसाह्य।।
निवृत्ति घनवट पिकलिसे पेठ। पुंडलिकें प्रकट केलें असे।।

– संत निवृत्तीनाथ




# वारी, भक्तीचा उद्घोष

**महाराष्ट्राला वारीची संपन्न परंपरा लाभलेली आहे. जातीधर्माच्या भिंती तोडत, सर्वांप्रती समभाव आचरत, सहिष्णुता-बंधुता-समानतेचा उद्घोष करत वारकारी संपद्राय पंढरीच्या वाटे चालू लागतो तेव्हा भक्तीप्रवाहाचं ते विशाल रूप मनाचा ठाव घेतं. अलिकडच्या काळात काही नवे विचार रुजवण्यासाठी, समाजभान जागृतीसाठी, प्रबोधनासाठीही वारी हा एक महत्त्वपूर्ण सोहळा ठरत आहे.**

भक्ती विशेष

वैजयंती कुलकर्णी

सर्व संतांच्या पालख्या पंढरीची वाट चालू लागतात आणि एक अपूर्व सोहळा रंगू लागतो. वारी प्रत्येकाच्या मनात शाश्वत मूल्यांची पेरणी करत असते. आषाढी वारीला जास्त प्रमाणात पश्चिम महाराष्ट्रातील आणि खानदेशातील वारकरी असतात तर कार्तिकी एकादशीत विदर्भ आणि मराठवाड्यातील वारकरी असतात.

पंढरपूरचं विठ्ठल मंदिर, त्याला मानणारा भक्त संप्रदाय आणि विठुरायाचं गुणवर्णन करणारं आपलं संतवाङ्मय



हा मराठी संस्कृतीचा गाभा आहे. शंकराचार्यांनीसुद्धा भीमेच्या काठावरील पांडुरंगाचं वर्णन केलेलं आहे. वारीची परंपरा कमीत कमी हजार वर्षांची असावी असं जाणत्या लोकांचं मत आहे. महाराष्ट्रात अनेक राजकीय स्थित्यंतरं झाली, परकीय आक्रमणं झाली तरीही वारीची परंपरा अखंड सुरू राहिली. पांडुरंग म्हणजे सगळ्या संतांचा सखा... संत तुकाराम म्हणतात,

**'आमुची मिरासी पंढरी।**
**आमुचे घर भीमातीरी।।**
**पांडुरंग अमुचा पिता।**
**रखुमाई आमची माता।।**
**भाऊ पुंडलिक मुनी।**
**चंद्रभागा आमुची बहिणी।।**
**तुका जुनाट मिरासी।**
**ठाव दिला पायापाशी।।'**

विठ्ठलावरील प्रेम, त्याची ओढ आणि विठ्ठलाविषयी असणारी सख्यभक्ती सर्व संतांच्या म्हणजेच नामदेव, ज्ञानदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, चोखा मेळा, निळोबा, गोरा कुंभार, सावतामाळी आदींच्या लेखणीतून दिसून येते. हाच विचार भक्तीसंप्रदायाला समृद्ध करतो.

न्या. रानडे यांनी वारकरी संप्रदायाला भागवत धर्म म्हटलं आहे. चंद्रभागेच्या तीरावर उभ्या असणाऱ्या सावळ्या परब्रह्माला सर्व संतांनी आपलंसं केलं आहे. भागवत धर्माचं आणि सगुण भक्तीचं नवं तत्त्वज्ञान सांगितलं आहे. ही परंपरा उदार धर्माचा पुरस्कार करणारी आहे. सर्व संतांनी सहिष्णुतेचा, चित्तशुद्धीचा आणि सर्वाभूती समत्त्वानं पाहण्याचा उपदेश केला. रंजल्या-गांजल्यांची सेवा करावी, सर्वांना सारखाच दया धर्म दाखवावा हीच या संपन्न परंपरेची शिकवण आहे.

वारकरी संप्रदाय हा सर्वांसाठी खुला आहे. लोकजीवनाशी मिळून मिसळून वागणारा आहे. म्हणूनच हा एक प्रवाही संप्रदाय आहे. वारकरी कोणाला म्हणावं याचे काही निकष आहेत. त्यात नियमित वारी करावी, कपाळावर गोपीचंदनाचा टिळा लावावा, गळ्यात तुळशी माळ घालावी, मद्य-मांस खाऊ नये आणि दररोज हरीपाठाचे अभंग म्हणावे हे अभिप्रेत आहे. म्हणजेच ही वारकऱ्यांची वैशिष्ट्यं आहेत. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मामध्ये पसरला आहे. एकदा तरी पंढरीला जाऊन विठुरायाचं दर्शन घ्यावं ही इच्छा महाराष्ट्रातील प्रत्येक विठुभक्ताच्या मनात असते.

पंढरपूरची वारी कुटुंबातील काही व्यक्ती एकत्रितपणे अथवा काही स्वतंत्रतेनं करतात. काही जण आपल्या गावातील दिंडीत सहभागी होऊन वारीला जातात.

वारी नेहमी पायीच केली जाते. वारकरी संप्रदायात अनेक गुरू आहेत. त्यातील काही जण विविध मठांचे प्रमुख, कीर्तनकार, प्रवचनकार आहेत. साधूवृत्तीने वर्तणूक असल्यानं त्यांना सर्वजनांकडून सन्मान मिळतो. पंढरपुरात या महाराजांचे अनेक मठ असल्याने वारीच्या वेळी तिथे हजारो वारकरी राहतात. भक्ती आणि ज्ञानाचा समन्वय साधला जातो. हे मठाधिपती प्रवचनं, कीर्तनं करतात. अद्वैत वेदांताचा पुरस्कार करतात. इथे कीर्तनाबरोबर गोपालकाल्याचा उत्सवही रंगतो. या संप्रदायात सकाम भक्तीभाव दिसतो. वारकऱ्यांनी अनेक धर्मसंकटांमध्ये सुद्धा 'ग्यानबा-तुकाराम' हा मंत्र सोडलेला नाही. वारकरी संप्रदाय नेहमीच राजकारणापासून दूर राहिलेला आहे. या संप्रदायामध्ये उदारता, सहिष्णुता, चित्तशुद्धी आणि सर्वांप्रति आत्मियता आदी सात्त्विक गुण दिसून येतात.

वारी सर्वांचीच आहे. वारकरीपंथ हा समाजाचा पंथ आहे. त्यामध्ये कर्मकांड नाही. वारकरी संप्रदाय सर्वांना सामावून घेतो. त्यामुळेच वारकरी पंथ आणि वारी समाजातील सर्वांना आपलीशी वाटते. समाजातील सर्व स्तरांना सामावून घेतल्याने जाती-भेद उरतच नाही. भक्तीतील या पावनतत्त्वाची शक्ती आणि शरणागती सर्वांचा उद्धार करून जाते. आपण करतो ते प्रत्येक काम, प्रत्येक कर्म विठ्ठलाचं आहे अशी प्रत्येकाची धारणा असते. त्यामुळेच प्रत्येक कामाला गती येतेच शिवाय मनात सत्कृत्य करत असल्याची भावना राहते आणि समाधान मिळतं.

आता बदलत्या काळात, जागतिकीकरणाच्या झंझावातात वारीतही मोठे बदल होत आहेत. जुन्या पिढीबरोबर नव्या पिढीतील लोकही उत्साहाने वारीत सहभागी होत आहेत. वारकरी संप्रदायातील काही गटांनी पर्यावरणाला हानिकारक असणाऱ्या प्रकल्पाविरुद्ध चळवळी उभ्या केल्या आहेत. वारीच्या नव्या रूपाला सामोरं जाताना त्यामध्ये ग्रामविकास, पर्यावरण संरक्षण, जातीभेद निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आदी गोष्टींचा विचार करुन त्याविषयी प्रबोधन होत आहे. वारकरी संप्रदायानं आपला भक्तीभाव, सहिष्णूता आणि प्रवाही रूप कायम ठेवलं आहे. हे महात्म्य जाणूनच आपले तुकाराम महाराज म्हणतात,

**ऐसी चंद्रभागा ऐसे भीमातीर।**
**ऐसा विटेवर देव कोठे।।**
**ऐसे संतजन ऐसे हरिदास।**
**ऐसा नामघोष सांगा कोठे।।**
**तुका म्हणे आम्हा अनाथा कारणे।**
**पंढरी निर्माण केले देवे।।**

पांडुरंगाने आपल्यासारख्या अनाथांसाठी पंढरी निर्माण केलेली आहे याची जाणीव प्रत्येक वारकऱ्याच्या मनात असते. म्हणूनच तो पंढरीनाथाच्या दर्शनासाठी उत्सुक असतो.

# देव भावाचा भुकेला

बोल ज्ञानियाचे

देव भावाचा भुकेला असतो. भक्ताला भगवंतांच्या कृपेची आस असते त्याचप्रमाणे भगवंतालाही भक्ताकडून निरलस प्रेमाची आस असते. पुढील ओवीत भगवंताच्या याच भावाचं विवेचन केलं आहे. भगवंत आणि भक्त यांच्या नात्याचं विवेचन करताना माऊली म्हणतात,

**पै या भक्तासि माझे कोड।**
**मज तयाचे अनन्य गतींची चाड।**
**कां जे प्रेमळांचे साकडं।**
**आमुचिया घरी ।।**

तान्ह्या बाळाला आईच्या प्रेमाची गरज असते त्याप्रमाणे भगवंतालाही भक्ताच्या शुद्ध प्रेमाची आस असते. ईश्वर म्हणतो, सदा सर्वकाळ माझ्या ठिकाणी चित्त ठेवून प्रेमपूर्वक भजन करणाऱ्यांना मी बुद्धियोग देतो आणि त्याच्या योगाने ते माझ्या स्वरूपाला येऊन मिळतात.

बुद्धियुक्त होणं म्हणजे निष्काम कर्म करण्यास प्रवृत्त करणारी वृत्ती जोपासणं. एकदा ती प्राप्त झाली म्हणजे मनुष्य कर्माच्या विळख्यात अडकत नाही. बुद्धीने स्वतःला परब्रह्माशी जोडून घेणं यालाच बुद्धियोग म्हणतात. अर्थात त्यासाठी बुद्धी आणि वैराग्य यांची सांगड घालता आली पाहिजे. बुद्धी आणि वैराग्याची सांगड घातल्यावर व्यक्ती भगवंतमय होऊन जाते. त्या रुपाशी एकरुप होते. अशा भक्तांच्या सर्व कृती ब्रह्मरूप होतात. आत्मज्ञानी पिंड आणि ब्रह्मांड यांचं ऐक्य अनुभवतात.



माऊली म्हणतात, 'लाडकं लेकरू खेळत असता आई त्याच्यावर प्रेमदृष्टी ठेवून असते. ती त्याच्या मागोमाग धावते आणि लेकरू मागेल तो खेळ त्याच्यापुढे ठेवते, त्याप्रमाणे भगवंतही भक्तांच्या इच्छेप्रमाणे उपासनेचे मार्ग वाढवतो. भक्त येऊन मिळतील अशा सर्व मार्गांचं तो प्रेमाने रक्षण करतो.' भक्तांना माझं प्रेम हवं असतं तद्वतच मलाही त्यांच्या अनन्यभावाची आवड असते, असं परमेश्वर सांगतो. माझ्या घरी प्रेमळ भक्तांचा दुष्काळ आहे. आम्ही सर्वस्व देऊन प्रेमळ भक्त घेतो असंही भगवंत कबूल करतो.

# इथे उंदरांची गर्दी

अजबगजब



भारतात हजारोंच्या संख्येनं रहस्यमयी मंदिरं आहेत. तिथे बघायला मिळणारे अद्भूत नजारे, चित्रविचित्र प्रथा-परंपरा आपल्याला कोड्यात टाकतात. त्यांचा उगम कसा आणि कधी झाला असेल हा प्रश्न सतावतोच त्याचबरोबर त्या का पडल्या असाव्यात हा विचारही मेंदू व्यापून टाकतो. राजस्थानातील बिकानेर येथे स्थित करनी माता मंदिरातील नजाराही अशाप्रकारे विचारास प्रवृत्त करणारा आहे. करनी मातेच्या या अनोख्या मंदिरात तसंच त्या परिसरात जवळपास २० हजार उंदरांचा वावर आहे. करनी मातेला दुर्गेचा अवतार समजतात. दररोज हजारोंच्या संख्येने भाविक आणि पर्यटक या मंदिराला भेट देतात आणि देवीची करुणा भाकतात. यामध्ये देवीच्या आराधनेबरोबरच प्रचंड संख्येने असणारे उंदीर बघणं



हेदेखील आकर्षणाचं केंद्र असतं.

इथे उंदरांना 'काबा' म्हणतात. अन्नाची व्यवस्था करणं तसंच त्यांचं संरक्षण करणं याकडे मंदीर व्यवस्थापन जातीने लक्ष पुरवतं. एरवी उंदीर हा आजार पसरवणारा जीव म्हणून कुप्रसिद्ध आहे. त्यामुळे घरात एखादा उंदीर शिरला तरी त्याला हुसकावलं जातं. उंदरांमुळे परिसर अस्वच्छ होतो. त्यांच्या वावराने संबंधित स्थळी एकप्रकारची दुर्गंधी पसरते. मात्र हे सगळे मुद्दे इथे गैरलागू ठरतात. इतक्या मोठ्या संख्येने उंदरांचा वावर असून या परिसरातील स्वच्छता प्रभावीत होत नाही. उंदारांमुळे इथे कोणताही आजार पसरल्याची नोंद नाही. इतकंच नव्हे तर मंदिर परिसरात दुर्गंधही जाणवत नाही. भाविकांना उंदरांच्या गर्दीतून वाट काढतच गाभाऱ्यापर्यंत पोहोचावं लागतं. त्यांना उंदरांनी चाखलेला प्रसाद दिला जातो. पण तोच अत्यंत श्रद्धाभावाने ग्रहण केला जातो. एखाद्या उंदराने पायावरुन जाणं अत्यंत शुभ समजलं जातं. त्यातही पांढरा उंदीर दृष्टीस पडणं परमभाग्याचं लक्षण समजतात.

अशी ख्याती असल्यामुळेच या मंदिराची 'मूषक मंदिर' अशी ख्याती आहे. ही करनी माता बिकानेर राजघराण्याची कुलदेवता आहे. त्यामुळे राजपरिवारातील सदस्यही नियमित देवीचं दर्शन घेण्यासाठी येतात.

# सत्त्वगुणांमधील सामर्थ्य

समर्थ उवाच

प्राचीन काळी कपिल मुनींनी सकळ विश्वातील प्रत्येक जीव सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी बनलेला आहे असं मत मांडलं जे भारतीय संस्कृतीत सर्वमान्य आहे. या तीन्ही गुणांना मिळून त्रिगुण म्हणतात. यातील रजोगुणाबाबत समर्थ रामदास स्वामी सविस्तर बोलतात. ते म्हणतात,

**माझे घर माझा संसार। देव कैंचा आणिला थोर। ऐस करी जो निर्धार। तो रजोगुण।।**
**माता पिता आणि कांता। पुत्र सुना दुहिता। इतुकियांची वाहे चिंता। तो रजोगुण।।**
**मी तरुण मी सुंदर। मी बलाढ्य मी चतुर। मी सकळांमध्ये थोर। म्हणे तो रजोगुण।।**

याद्वारे व्यक्तीमध्ये प्रामुख्याने जो गुण असेल त्याप्रमाणे त्याची प्रवृत्ती बनत जाते असं समर्थ सांगतात. गुणानुक्रमे सत्त्वगुण सर्वात श्रेष्ठ, रजोगुण मध्यम आणि



तमोगुण सर्वात कनिष्ठ मानला जातो. ज्ञान, परोपकारी बुद्धी, समाधान, निस्वार्थीपणा आदी सत्त्वगुणाने प्राप्त होणारे सद्गुण आहेत. प्रापंचिक प्रवृत्ती, सुखासाठी धडपड, शौर्य आणि लढाऊ वृत्ती हे रजोगुण होत तर मद, मोह, लोभ, आळस, खल प्रवृत्ती ही तमोगुणाची लक्षणं आहेत. प्रत्येक माणसात यांच्या कमी-अधिक प्रमाणामुळे वासना आणि बुद्धी तयार होत असते. सत्त्वगुण सर्वोत्तम, तमोगुण नीचीचा तर रजोगुण मध्यम समजावा असं सांगून समर्थ म्हणतात की, सत्त्वगुण सर्वोत्तम असून त्यामुळे परमेश्वरप्राप्ती होते. रजोगुण मध्यम असल्याने पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात जावं लागतं तर तमोगुणामुळे नशिबी अधोगतीच येते.

प्रत्येक माणसाने या त्रिगुणांची ओळख करुन घेणं आणि आत्मपरीक्षण करुन आपल्यात कोणते गुण आहेत हे जाणून घेणं गरजेचं ठरतं. प्रगतीपथावर जाण्यासाठी हे आत्मपरीक्षण साह्यभूत ठरतं. आचार्य विनोबा भावे या तीन्ही गुणांना संस्कृती, प्रकृती आणि विकृती म्हणत असत. ते म्हणत, आपण भुकेले असतानाही भाकरीतील तुकडा दुसऱ्याला देणं ही संस्कृती आहे, भूक लागल्यानंतर ती दुसऱ्याला न देता खाणं ही प्रकृती आहे आणि दुसऱ्याची भाकरी हिसकावून घेणं ही विकृती आहे. या विचारामधील मर्म ओळखायला हवं.

# अनुभव हाच गुरू

जीवनमंत्र



**खाली पेट, खाली जेब और झूठा प्यार...**
**ये आदमी को वो सबक सिखा देते हैं,**
**जो जिंदगी में बडे से बडा गुरु भी नहीं सिखा सकता...**

आयुष्यात अनेक गुरु भेटतात. लहानपणी आई-वडिलांकडून मूल्यशिक्षण मिळतं. शिक्षकांकडून पुस्तकी शिक्षण मिळतं. नोकरी-धंद्यानिमित्त संपर्कात येणारे वरिष्ठ आपल्याला त्या क्षेत्रातील ज्ञान शिकवून जातात. आध्यात्मिक गुरू ईश्वरभक्तीचं मर्म समजावून सांगतात. पण खरं सांगायचं तर या सर्वांपेक्षा अनुभव हाच माणसाचा सर्वात मोठा गुरू असतो. आयुष्यात पदोपदी येणारे अनुभव आपल्याला शहाणं करत असतात. जगण्याच्या प्रत्येक आयामांची, या जगातील कठोर नियमांची ओळख या अनुभवांमुळेच होते. खिशात पैसे नसताना, पोटात भुकेचा आगडोंब उसळलेला असताना आणि प्रेमात फसवणूक झालेली असताना आलेले अनुभव जगरहाटीचं कटु वास्तव सामोरं आणतात आणि त्यामुळेच आपल्याला जगण्याचं मर्म समजतं. खऱ्या अर्थाने हेच अनुभव आपल्याला जगण्याच्या गाभ्यापर्यंत नेतात. चांगल्या-वाईटाची पारख करणारी दृष्टी देतात. या ढोंगी जगात वावरण्यासाठी हवा तो चलाखपणा या अनुभवांमुळेच मिळतो. म्हणूनच अनुभवांवरुन मिळालेल्या शहाणपणाचा वापर करुन कृती करणारा, दुधाने जीभ पोळली की ताकही फुंकून पिणारा, येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करुन पुढे जाण्याची जिद्द ठेवणारा माणूस कधीही माघार घेत नाही. तो जिंकण्यासाठीच लढतो. हरला तरी प्रयत्नांमध्ये कोणतीही कसूर ठेवत नसल्यामुळे आलेल्या अपयशाचा हसत हसत स्वीकार करणं आणि आपल्या कमकूवत बाजू जाणून घेत त्या बलिष्ट करणं यास तो प्राधान्य देतो. त्याच्यासाठी अपयश ही यशाची पहिली पायरी ठरते.

# यात्रा जगन्नाथाची

आनंदयात्रा

भारतातील अनेक यात्रा जगप्रसिद्ध आहेत. जगन्नाथपुरीतील रथयात्रा त्यातीलच एक! आषाढाच्या शुक्ल पक्षातील द्वितीयेला या यात्रेस प्रारंभ होतो. यंदाची यात्रा लवकरच (१४ जुलै) सुरू होत आहे. भगवान जगन्नाथ, भाऊ बलराम आणि बहीण सुभद्रा यांचे रथ ओढून, त्यांना नगरभ्रमण घडवून ही यात्रा संपन्न होते. यात्रा जगन्नाथ मंदिरापासून सुरू होऊन गुण्डिचा मंदिरापर्यंत पोहोचते. कित्येक वर्षांपासून ही यात्रा अत्यंत भक्तिभावाने संपन्न होत आहे. या पवित्र रथयात्रेशी संबंधित अनेक कथा प्रचलित आहेत.

त्यातील एक अशी की, कलयुगाच्या सुरूवातीच्या काळात मालव देशावर इंद्रद्युम राजाचं राज्य होतं. तो भगवान जगन्नाथाचा निस्सीम भक्त होता. एक दिवस जगन्नाथाचं दर्शन घेण्यासाठी राजा नीलांचल पर्वतावर गेला मात्र त्याला देवाची प्रतिमा दिसली नाही. पण निराशावस्थेत परतत असतानाच, 'लवकरच मूर्तीस्वरुपात भगवान जगन्नाथाचं दर्शन घडेल' अशी आकाशवाणी त्याच्या कानी पडली. काही काळानंतर समुद्रकिनारी फिरत असताना राजाला लाटांवर तरंगणारे तीन विशाल ओंडके दिसले. त्या क्षणी पुन्हा एकदा आकाशवाणी झाली आणि जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या प्रतिमा बनवण्यासाठी देवतांचा शिल्पकार विश्वकर्मा प्रकट होत असल्याची



सूचना राजाला मिळाली. अर्थातच त्याच्या आनंदाला पारावार उरला नाही. काही क्षणातच विश्वकर्मा समोर प्रकटला पण त्याने एक अट घातली. ती म्हणजे, तिन्ही मूर्ती पूर्ण एकांतात घडवल्या जातील. त्यादरम्यान कोणी आलं तर मी निघून जाईन. राजाने अट मान्य केली. अगदी एकांतात गुण्डिचा नामक परिसरात हे काम सुरू झालं. मात्र एकदिवस अनवधानाने राजानेच त्या जागी प्रवेश केला आणि त्याला पाहताच विश्वकर्मा अंतर्धान पावला. भगवान बलभद्र, जगन्नाथ आणि सुभद्रा यांच्या मूर्ती अपूर्ण राहिल्या. राजा खट्टू झाला. मात्र देवाने आकाशवाणीद्वारे, आपल्याला याच रुपात प्रतिष्ठापित करण्याची आज्ञा दिली. तेव्हा राजाने भव्य मंदिराची उभारणी करुन त्यात प्रतिमा प्रतिष्ठापित केल्या. जगन्नाथाने दिलेल्या आज्ञेनुसार या प्रतिमा वर्षातून एकदा निर्माणस्थळी नेल्या जातात. स्कंदपुराणातील उत्कल खंडात हा सर्व उल्लेख आढळतो. आजही भाविक श्रद्धापूर्वक जगन्नाथाचा रथ ओढतात.



# देवभूमी नेपाळ

तीर्थाटन

जगातील एकमेव हिंदू राष्ट्र म्हणजे नेपाळ. नेपाळला भारताचा 'धाकटा भाऊ' म्हटलं जातं. नेपाळनं हिंदू संस्कृतीचा समृद्ध वारसा जपला आहे. तेथील सर्वांगसुंदर मंदिरं याची साक्ष देतात. यातील काही महत्त्वाच्या मंदिरांविषयी...

*** पशुपतिनाथ मंदिर** – नेपाळची राजधानी काठमांडूपासून तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बागमती नदीच्या काठावरील देवपाटन गावात पशुपतिनाथाचं मंदिर स्थित आहे. मोठा विस्तार असणाऱ्या या मंदिरात केवळ हिंदूनाच प्रवेश दिला जातो. युनेस्कोने जागतिक वारसा यादीत या मंदिराचा समावेश केला आहे.

*** जानकी मंदिर** – नेपाळच्या जनकपूरमध्ये हे मंदिर स्थित असून ते देवी सीतेला समर्पित आहे. या मंदिराची स्थापना टिकमगडची राणी वृषभानू कुमारी हिने १९११ मध्ये केली.

*** मुक्तीनाथ मंदिर** – हे मंदिर नेपाळमधील प्रमुख धर्मस्थळांपैकी एक आहे. बौद्ध आणि हिंदूधर्मीय या मंदिराला भेट देतात. इथे मनोभावे नमस्कार करणाऱ्याला मोक्षाची प्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.



*** मनोकामना मंदिर** – काठमांडूपासून १०५ किलोमीटरवर असणारं हे मंदिर गोरखा जिल्ह्यात आहे. या मंदिराला भेट दिल्यानंतर भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात.

## महामार्गांच्या माध्यमातून मिळेल रोजगार निर्मितीला चालना : नितीन गडकरी

# भंडारा बायपास व मौदा वाय-जंक्शनचे लोकार्पण

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ५:** कुठल्याही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पाणी, वीज, वाहतूक व दळवळणाची साधने आणि संवादाची माध्यमे विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पायाभूत सोयीसुविधा उत्तम होणे गरजेचे असते. भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील महामार्गाचे जाळे सर्वांगीण विकासाला व रोजगार निर्मितीला चालना देणारे ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. भंडारा जिल्हा औद्योगिक, कृषी, पर्यटनाच्या दृष्टीने विकसित व्हावा, असा उद्देश असल्याचेही ते म्हणाले.



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय तसेच भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संयुक्त विद्यमाने लोकार्पण व भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात आला. १४.८० किलोमीटरचा भंडारा बायपास आणि मौदा वाय-जंक्शन सहापदरी उड्डाणपुलाचे भूमिपूजन नितीन गडकरी गडकरी यांच्या हस्ते झाले. त्याचवेळी मानेगाव व्हेहीकुलर ओव्हरपास, बापेरा ते तुमसर डांबरीकरण आणि खापा ते भंडारा मागार्चे डांबरीकरण कार्यक्रमाचे भूमिपूजन यावेळी झाले. या कार्यक्रमाला खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार संजय पुराम, आमदार राजू कारेमोरे, माजी खासदार सुनील मेंढे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी गडकरी म्हणाले, ह्यमाज्या विद्यार्थीदशेत भंडाऱ्यात अनेकदा स्कुटरने यायचो. येथून लाखनी व साकोलीपर्यंत कामासाठी जायचो. त्यावेळी वैनगंगेवरील जुना पूल पाण्याखाली यायचा. त्यामुळे वाहतूक बंद व्हायची. मंत्री झाल्यावर वैनगंगेवर मोठ्या पुलाची निर्मिती केली. आज केंद्रीय मंत्री म्हणून ७३५ कोटी रुपयांचा अतिशय आधुनिक बायपास आज भंडाऱ्याला देताना आनंद होतोय. बायपास नसताना सातत्याने मौदा आणि भंडारा येथे खूप अपघात व्हायचे. वाय जंक्शनलाही हीच स्थिती होती. मात्र, तिथेही पूल झाल्यामुळे अपघात थांबतील, असा विश्वास आहे.

नागपूर ते भंडारा सहापदरी रस्त्याच्या कामाची सुरुवात लवकरच होईल, अशी घोषणाही नितीन गडकरी गडकरी यांनी यावेळी केली. भंडारा शहरातील जुन्या राष्ट्रीय महामार्गाला ९ किलोमीटरच्या सिमेंट कॉंक्रिट रोडसाठी शंभर कोटी रुपये मंजूर केले आहेत, अशी माहितीही नितीन गडकरी यांनी दिली.

### जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळाची क्षमता

भंडारा हा जंगलांचा जिल्हा आहे. येथील नवेगाव बांध व नागझिरा ही जंगले जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ होऊ शकतात. भंडारा जिल्ह्याच्या विकासात खनीज संपत्ती व वनांची मोठी भूमिका आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये रोजगाराची मोठी क्षमता आहे, असेही नितीन गडकरी गडकरी म्हणाले.

## विद्यार्थी नात्याने नवीन विषयांचा प्रांजळपणे अभ्यास करणेही गरजेचे

# सरन्यायाधीश भूषण गवई




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** विविध आव्हानात्मक परिस्थितींचा सामना करतांना वेळप्रसंगी प्रत्येक नवीन विषयाचा विद्यार्थी या नात्याने प्रांजळपणे अभ्यास करणेही गरजेचे असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

हॉटेल ताज महल पॅलेस येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती उज्वल भुयान, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर व तेजस्विनी गवई हे उपस्थित होते. यावेळी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते मुंबई उच्च न्यायालयातील लाईव्ह स्ट्रीमिंग प्रणालीचे तसेच वाय फाय सेवेचे उद्घाटन करण्यात आले.

सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले, प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात काम करतांना तळमळीने आणि सदसद्विवेकबुद्धी जागृत ठेवून काम करण्यावर भर देणे महत्त्वाचे आहे. नव्या पिढीतील सहका-यांना सकारात्मक दृष्टिकोनाने प्रेरित करणे आणि त्यांच्यातील अंगभूत गुणांना अधिक सक्षम करणे हे वरिष्ठांचे कर्तव्य आहे. याबरोबरच काम आणि कार्यालयीन जबाबदाऱ्या यामध्ये संतुलन राखणेही गरजेचे आहे. उच्च न्यायालयाने नव्याने उपलब्ध करून दिलेल्या आधुनिक सुविधा नागरिकांसाठी नक्कीच उपयुक्त ठरतील असा विश्वास सरन्यायाधीश गवई यांनी व्यक्त केला. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्यायमूर्ती प्रसन्न वराळे, न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान, न्यायमूर्ती अतुल चांदूरकर यांनी मनोगतात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कारकीर्दीचा गौरव केला.

# रेल्वे मार्गावर वन्यजीवांसाठी सुरक्षा उपाय

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५:** राज्यातील वनक्षेत्र आणि व्याघ्र भ्रमणमार्गामधून जाणाऱ्या आठ रेल्वे मार्गिकांवर वन्यजीवांच्या हालचाली सुकर होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची शिफारस भारतीय वन्यजीव संस्थानने (डब्लूआयआय) केली आहे. या आठ रेल्वे मार्गिकांमध्ये नागपूर-कटोल, नागपूर-बुट्टीबोरी-वर्धा, देव्हाडी-गोबरवाही, गोंदिया-वडसा, वडसा-नागभीड-मूल, मूल-चंद्रपूर आणि चंद्रपूर-राजुरा-कागजनगर यांचा समावेश आहे.



केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी नुकत्याच प्रकाशित केलेल्या एलिफंट अँड अदर वाईल्डलाईफ ट्रेन कॉलिजन ऑन व्हनरिबल स्ट्रेटेचेस इन इंडिया' अहवालात या शिफारसी करण्यात आल्या आहे. विदर्भातील आठ रेल्वे मार्गिकांवर १२५ लेव्हल क्रॉसिंग, ५१ पुलांचा विस्तार, चार ठिकाणी कुंपण, नऊ ठिकाणी अंडरपास आणि एका ठिकाणी ओव्हरपास बांधण्याच्या शिफारसी करण्यात आल्या आहेत.

प्रोजेक्ट एलिफंट'अंतर्गत एलिफंट अँड अदर वाईल्डलाईफ ट्रेन कॉलिजन ऑन व्हनरिबल स्ट्रेटेचेस इन इंडिया' हा अहवाल तयार करण्यात आला आहे. यासाठी डब्लूआयआय'च्या शास्त्रज्ञांनी वन विभाग आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांसोबत १४ राज्यांमधील वनक्षेत्र आणि व्याघ्र व हत्ती भ्रमणमार्गांमधून जाणाऱ्या १२७ रेल्वे मार्गिकांचे सर्वेक्षण केले. त्यामधील ७७ रेल्वेमार्गिकांवर उपाययोजना करण्याची गरज त्यांना जाणवली.

## ॲग्रोव्हिजन तर्फे आज विशेष कार्यशाळा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५:** शेतीमध्ये आधुनिक विज्ञानाचा वापर करून उत्पादन व शाश्वतता वाढवण्याच्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून ॲग्रोव्हिजनतर्फे ऊस शेतीसाठी एआय तंत्रज्ञान या विषयावर रविवार, दि. ६ जुलैला विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता एनबीबीएस सभागृह, अमरावती रोड नागपूर येथे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता व अत्याधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग आणि फायदे यांची सखोल माहिती मिळणार आहे.



■ **नागपूर :** उपराजधानीत शनिवारी सकाळी एक थरार पाहायला मिळाला. सिव्हील लाईन परिसरात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर माजी मंत्री अनिल देशमुख यांच्या बंगल्यानजिक एक मद्यधुंद युवकाने कारसह रस्ता दुभाजकाला धडक दिली. सकाळी ९ च्या सुमारास घडलेल्या या अपघातात युवकाला फारसे लागले नसले तरी कारचे मात्र नुकसान झाले.

## 'म' म्हणजे मराठी नाही, महापालिका!

### ठाकरे बंधूच्या विजयी सभेवर बावनकुळेंची प्रतिक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५:** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची बहुचर्चित विजयी सभा मुंबईत पार पडली. अपेक्षेप्रमाणे ती ग्रॅण्ड सभा झाली. ठाकरे शैलीत दोन्ही ठाकरे बंधूनी महायुती सरकावर टीका केली. त्यावर भाजपकडून प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागल्या. माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यानी एक्सवर त्यांची प्रतिक्रिया दिली.



बावनकुळे म्हणतात मराठीच्या गोंडस नावाखाली आज उद्धव ठाकरे यांनी वरळीत सत्ता गेल्याचं शोकगीत गायलं. पण मुख्यमंत्री असताना २०२२ मध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला, याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही.

मराठी भाषा ही केवळ भावनांमध्ये उभी राहणारी अस्मिता नाहीतर ती धोरणात दिसली पाहिजे. पण तुम्ही मुंबईत सत्तेत असताना मराठी माणसाला हद्दपार केलं आणि आता सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा मराठीवर बेगडी प्रेम करत आहात. उद्धव ठाकरेंच्या भाषणातून स्पष्ट होतंय की, त्यांचा खरा अजेंडा म म्हणजे मराठी नाही, तर म म्हणजे महापालिका आहे!

यांचं मराठीप्रेम म्हणजे निवडणुका जवळ आल्या की आठवण येणारी राजकीय नौटंकी आहे. जनतेनं आता हा दुटप्पीपणा ओळखला आहे.

## दोन दुचाकींची समोरासमोर धडक

# एकाचा मृत्यु

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. ५:** कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत सालवा येसंबा फाटा जवळ दोन दुचाकी वाहनात समोरासमोर जोरदार धडक झाल्यने अपघातात एकाचा मृत्यु झाला.

सोमराज अशोक गिरी (३५) रा.रेवराल यांचा भासरा दुर्गेश गोविंद वैकुडे (१८) रा.सिल्ली तिरोडा याचे अग्नीवीर परिक्षा असल्याने चुलत भाऊ सुभाष प्रभु गिरी (३२) रा.सिल्ली तिरोडा हे त्याला परिक्षा देण्याकरिता नागपुर येथे सोमवार (दि.३०) जुन रोजी होंडा शाईन दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० सीके ७१०९ ने घेऊन गेले आणि जास्त पाऊस येत असल्याने मामा महेश सरोदे रा.नागपुर यांचा घरी थांबले.

मंगळवार (दि.१) जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता च्या दरम्यान सोमराज गिरी घरी असतांना त्यांना दुर्गेश वैकुडे यानी फोन करुन सांगितले कि सालवा येसंबा फाटा जवळ अपघात झला आहे आणि सुभाष गिरी गंभीर जख्मी झाला आहे. आम्ही वानखेडे हॉस्पीटल येथे उपचारा करिता घेवुन जात आहे. सोमराज गिरी वानखेडे हॉस्पीटल येथे पोहचला असता त्याला चौधरी हॉस्पीटल कामठी येथे घेऊन गेल्याची माहिती मिळाली. चौधरी हॉस्पीटल येथे पोहचला असता त्याला माहिती मिळाली कि सुभाष गिरी याला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

गोविंद वैकुडे आणि सुभाष गिरी हे होंडा शाईन दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० सीके ७१०९ ने नागपुर वरुन सायंकाळी ५:३० वाजता रेवराल येथे जाण्याकरिता निघाले व ७ वाजता च्या दरम्यान सालवा येसंबा फाटा जवळ समोरुन येणाऱ्या पॅशन प्रो दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० बीटी ०३२७ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजी पणाने चालवुन कोणतेही सिग्नल न देता आमरो समोर जोरदार धडक दिली. त्यामुळे सुभाष गिरी आणि पॅशन प्रो दुचाकी वाहन चालक वाहना वरुन खाली सत्यावर पडले. सुभाष गिरी याला डोक्यावर गंभीर दुखापत झाल्याने उपचारा करिता चौधरी हॉस्पीटल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन त्याला मृत घोषित केले.

